




# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com








* वर्ष ६४ वे * अंक १९३ * नांदेड * रविवार, दि. २० जुलै २०२५ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎ : 255777, Fax :252211


# राज्यात अनुकंपावरील १० हजार पदे भरण्याचा निर्णय; उमेदवारांच्या नियुक्तीचे सर्वाधिकार जिल्हाधिकाऱ्यांना

## सर्वाधिक ५०६ उमेदवार नांदेड जिल्ह्यात, सप्टेंबरपासून भरती

**मुंबई (प्रतिनिधी)–** गेल्या पाच वर्षांपासून अनुकंपा तत्वावरील नोकरीच्या प्रतिक्षेत असलेल्या सुमारे १० हजार जणांचे नोकरीचे स्वप्न लवकरच साकार होणार आहे. राज्य सकार, निमसरकारी संस्थामधील अनुकंपाच्या सर्व रिक्त जागा भरण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला असून सप्टेंबरपासून जिल्हाधिकाऱ्यांच्या माध्यमातून ही नियुक्ती प्रक्रिया राबविली जाणार असल्याची माहिती मंत्रालयातील सूत्रांनी दिली.

शासकीय अथवा निमशासकीय संस्थेतील एखाद्या कर्मचाऱ्यांचे सेवेत असताना निधन झाले तर त्याच्या वारसाला त्याच विभागात नोकरी देण्याचे अनुकंपा तत्वावरील नोकरीचे धोरण राज्यात सन १९७६ पासून राबविले जात आहे. या धोरणानुसार गट क आणि ड कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांसाठी ही अनुकंपा तत्वावरील नोकरीची सवलत आहे. राज्यात गेल्या पाच वर्षांपासून अनुकंपा नियुक्त्या रखडल्या आहेत. त्यामुळे तब्बल ९ हजार ६५८ उमेदवार नोकरीच्या प्रतिक्षेत आहेत. त्यामध्ये सर्वाधिक ५०६ उमेदवार नांदेड जिल्ह्यातील असून त्या खालोखाल पुणे ३४८, गडचिरोली ३२२, नागपूर ३२० उमेदवार नियुक्तीच्या प्रतिक्षेत आहेत. यामध्ये राज्य सरकारच्या सेवेतील ५ हजार २२८, महापालिका, नगरपालिकामध्ये ७२५ तर जिल्हा परिषदांमध्ये ३ हजार ७०५ उमेदवारांची नियुक्ती रखडलेली आहे. मात्र आता अनुकंपावरील प्रतिक्षायादी संपविण्यासाठी सर्व उमेदवारांची नियुक्ती करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. याशिवाय अनुकंपा नियुक्ती प्रक्रियेत अनेक सुधारणा करुन मृत कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांनाही मोठा दिलासा देणारा निर्णय मंत्रिमंडळाने घेतला आहे.

या निर्णयानुसार १५ सप्टेंबर पासून ही नियुक्ती प्रक्रिया सुरू केली जाणार आहे. सध्या अनुकंपा नोकरीसाठी मृत कर्मचाऱ्यांच्या नातेवाईकांना नोकरीसाठी एक वर्षात अर्ज करण्याचे बंधन असून आता त्यात तीन वर्षां पर्यंतची मुदतवाढ देण्यात आली आहे.तसेच सध्याच्या नियमानुसार अनुकंपासाठी ४५ वर्षे कमाल वयोमर्यादा असून त्यानंतर उमेदवाराचे प्रतिक्षा यादीतून नाव रद्द होत असे. आता एखाद्या उमेदवाराला ४५ वर्षांपर्यंत नोकरी मिळाली नाही तर त्या कुटुंबातील अन्य व्यक्तीला नोकरीचा हक्क देण्यात आला आहे. पूर्वी प्रतिक्षा यादीतील उमेदवाराला नाव बदल करता येत नव्हते मात्र आता कटुंबातील उमेदवाराचे नांव बदला येईल. तसेच एखाद्या कुटुंबाला अनुकंपा नोकरी योजनेची माहिती नसल्याने तीन वर्षात अर्ज करता आला नाही तरी त्या कुटुंबाला दोन वर्षांपर्यंत विलंब क्षमापित करण्याचा मुख्य सचिवांच्या समितीला असलेला अधिकार आता जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात येणार आहे.

# नांदेड जिल्ह्यात पावसाने पाठ फिरवली; पिकांची वाढ खुंटली

## सोयाबीन, कापूस, तूर, उडीद या पिकांना फटका




**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यात जुलै महिना अर्धा संपूनही पावसाने दमदार हजेरी लावली नाही, उलट पाठ फिरविल्याने शेतकऱ्यांच्या नजरा आता आकाशाकडे लागल्या आहेत. परिणामी खरिपातील सोयाबीन, कापूस, तूर, उडीद, मूग, ज्वारी या पिकांची वाढ खुंटली आहे. जिल्ह्यात १७ जुलैपर्यंत २८९.४० मिलिमीटर पाऊस पडणे अपेक्षित असताना आजपर्यंत १२४.४० मिलिमीटर पाऊस झाला आहे. यामुळे तब्बल ७५.२० मिलिमीटर पावसाची तूट निर्माण झाली आहे.

जिल्ह्यात जून ते ऑक्टोबर या पावसाळ्याच्या पाच महिन्यांत सरासरी ८९१.० मिलिमीटर पाऊस पडतो. यंदा मान्सूनपूर्व तसेच मॉन्सूनचे आगमन झाल्यानंतर पावसाचे दमदार आगमन झाले नाही. जिल्ह्यात आजपर्यंत सरासरी २१४.२० मिलिमीटरानुसार वार्षिक सरासरीच्या केवळ २४.०३ टक्के पावसाची नोंद झाली आहे. हा पाऊसही ठराविक भागातच झाला आहे. दरम्यान शेतकऱ्यांनी जुनमध्ये झालेल्या पावसानंतर पेरण्याची कामे आटोपून घेतली. यंदाही सर्वाधिक क्षेत्रावर सोयाबीनची पेरणी झाली आहे. यासोबतच कापूस व हळदीचा पेरही यंदा वाढला आहे. या पिकांना पेरणी करून सध्या एक ते दीड महिन्यांचा कालावधी होत आहे. परंतु नांदेड जिल्ह्यात मागील दहा–पंधरा दिवसांपासून पावसाने उघडीप दिली आहे. परिणामी खरिपातील सोयाबीन, कापूस, तूर, उडीद, मूग, ज्वारी या पिकांची वाढ खुंटली आहे. अनेक भागात सोयाबीन पिकांवर किडींचा प्रादुर्भावही झाला आहे. पावसाचे प्रमाण कमी असल्यामुळे सोयाबीनला मर लागली आहे. जिल्ह्यात दि. १७ जुलैपर्यंत २८९.४० मिलिमीटर पाऊस पडणे अपेक्षीत होते, असे असताना आजपर्यंत १२४.४० मिलिमीटर पाऊस झाला आहे. यामुळे जिल्ह्यात तब्बल ७५.२० मिलिमीटर पावसाची तूट निर्माण झाली आहे. पावसाने हुलकावणी दिल्यामुळे कमी कालावधीची मूग, उडीद यांसारख्या पिकांचे उत्पादन घटण्याची शक्यता शेतकरी व्यक्त करीत आहेत.

दरम्यान भारतीय हवामान विभागाने नांदेड जिल्ह्यात दि. १७, १८ व १९ जुलै या कालावधीत यलो अलर्ट जारी केला होता. परंतु जिल्ह्यात मात्र ढगाळ वातावरण असलेतरी पावसाने मात्र अद्याप सुरुवात केली नाही. यामुळे शेतकऱ्यांना चिंता लागली आहे.

# राज्यात आज मुसळधार पावसाची शक्यता



**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्यामध्ये मागील दोन दिवसांपासून पावसाचा जोर वाढल्याचं चित्र आहे. मराठवाडा, विदर्भ, दक्षिण कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांमध्ये जोरदार पाऊस झाल्याचे पाहायला मिळालं. आज दि. २० जुलै रोजी देखील राज्यातील बहुतांश भागांना जोरदार पावसाचा इशारा हवामान विभागाकडून देण्यात आला आहे.

मुंबई शहर आणि उपनगरामध्ये सामान्यतः ढगाळ आकाश राहणार असून अधून मधून हलक्या ते मध्यम पावसाची शक्यता आहे. ठाणे, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या जिल्ह्यांना हवामान विभागाने यलो अलर्ट दिला असून या जिल्ह्यांमध्ये तुरळ ठिकाणी मुसळधार पावसाचा इशारा भारतीय हवामानशास्त्र विभागाने दिला आहे.

तसेच मराठवाड्यातील संभाजीनगर, जालना परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव आणि बीड या जिल्ह्यांमध्ये ही तुरळ ठिकाणी विजांच्या कडकडाटासह हलका ते मध्यम पाऊस होण्याची शक्यता आहे. पश्चिम महाराष्ट्रात पुणे, सातारा, आणि कोल्हापूरचा घाट परिसर त्याचबरोबर कोल्हापूर, सातारा, सांगली, सोलापूर या जिल्ह्यांना हवामान विभागाने येलो अलर्ट दिला आहे. उत्तर महाराष्ट्रातील नाशिक, जळगाव, नंदुरबार, अहिल्यानगर, धुळे या जिल्ह्यांमध्ये तुरळ ठिकाणी विजांच्या कडकडाटासह हलका ते मध्यम पाऊस होण्याची शक्यता आहे.

# राज ठाकरे यांच्याविरुद्ध सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल

## हिंदी भाषिकांविरूद्ध बोलल्याचे प्रकरण

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज ठाकरेंविरुद्ध सर्वोच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्यात आली आहे. याचिकाकर्त्याने भाषा वादाला प्रोत्साहन देणाऱ्या भाषणांबद्दल राज ठाकरेंविरुद्ध एफआयआर नोंदवण्याची मागणी केली आहे. याचिकेत म्हटले आहे की राज ठाकरे यांनी हिंदी भाषिकांविरुद्ध प्रक्षोभक भाषणे दिली, ज्यामुळे वेगवेगळ्या गटांमध्ये द्वेष वाढला आहे.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे (मनसे) प्रमुख राज ठाकरे यांच्याविरुद्ध सर्वोच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्यात आली आहे. भाषा वादाला प्रोत्साहन देणाऱ्या भाषणांबद्दल राज यांच्याविरुद्ध एफआयआर नोंदवण्याचे निर्देश महाराष्ट्र पोलिसांना द्यावेत अशी मागणी याचिकेत करण्यात आली आहे.

या याचिकेनुसार, राज यांनी वेळोवेळी हिंदी भाषिक लोकांविरुद्ध प्रक्षोभक भाषणे दिली आहेत, ज्यामुळे जन्मस्थान, निवासस्थान आणि भाषेच्या आधारावर वेगवेगळ्या गटांमध्ये शत्रुत्व निर्माण झाले आहे, जे केवळ सुसंवाद राखण्यासाठी हानिकारक नाही तर भारताच्या सार्वभौमत्व, एकता आणि अखंडतेसाठी धोका आहे. अशा घटनांवर कडक कारवाई करण्याची मागणी याचिकेत केली आहे. यात म्हटले आहे की, केंद्र आणि महाराष्ट्र सरकारने राज आणि त्यांच्या राजकीय संघटनेकडून अशा घटना घडू नयेत याची खात्री करावी आणि या घटनांवर कडक कारवाई करावी. अधिवक्ता घनश्याम दयाळू उपाध्याय यांनी दाखल केलेल्या याचिकेत राज ठाकरे यांच्या मनसेची राजकीय मान्यता रद्द करण्याचे निर्देश भारतीय निवडणूक आयोग आणि महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाला देण्याची मागणीही करण्यात आली आहे.

# सरकारी नोकरीसाठी पित्याने एक लाखात चक्क मुलीला विकले

## ८ वर्षांनी धक्कादायक प्रकार उघडकीस

**नांदेड (प्रतिनिधी)–** पैशांच्या मोहापायी आणि सरकारी नोकरी जाईल या भीतीपोटी एका व्यक्तीने त्याच्या मुलीला विकल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी नांदेडच्या भाग्यनगर पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मुलीच्या आईने केलेल्या तक्रारीनंतर पोलिसांनी मुलीच्या वडिलांविरोधात कारवाई केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अल्पवयीन मुलीचे वडील हे हिंगोली येथे महसूल विभागाच्या दुय्यम निबंध कार्यालयात अनुकंपावर गेल्यावर शिपाई म्हणून भरती झाले. त्यांना पहिला मुलगा झाला. त्यानंतर दोन जुळ्या मुली झाल्या. जुळ्या मुलींपैकी एक मुलगी एक लाख रुपयांना विकल्याप्रकरणी मुलीच्या आईने भाग्यनगर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती.

अल्पवयीन मुलीच्या तक्रारीनंतर तब्बल आठ वर्षांनी मुलीला विकणारे वडील आणि तिला विकत घेणारा पुजारी या दोघांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आता पोलिसांनी त्या आठ वर्षीय मुलीला पुजाऱ्याकडून ताब्यात घेऊन एका सेवाभावी संस्थेमध्ये ठेवले आहे. मुलीच्या आईने माझी मुलगी मला परत देण्यात यावी अशी मागणी पोलिसांकडे केली आहे.

अल्पवयीन मुलीचे आरोपी वडील आणि तिची आई मागील आठ वर्षांपासून वेगळे राहत आहेत. गेल्या वर्षी मुलीच्या वडिलांना अनुकंपाखाली शिपाई म्हणून नोकरी लागल्याने हे प्रकरण वर आले आहे. नोकरी जाण्याच्या भीतीने पोटच्या मुलीने विकणाऱ्या वडिलांच्या विरोधात आणि तिला विकत घेणाऱ्या पुजाऱ्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. लवकरच दोघांवर कारवाई होईल असे म्हटले जात आहे.

# फडणवीस-आदित्य ठाकरे भेटीच्या चर्चेने राजकीय खळबळ

**मुंबई (प्रतिनिधी)–** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दोनच दिवसांपूर्वी उद्धव ठाकरेंना ऑफर दिल्यानंतर आता राज्याच्या राजकारणात मोठी बातमी आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि आदित्य ठाकरे हे तब्बल साडेचार तास एकाच हॉटेलमध्ये होते. वांद्रेमधील सोफिटेल हॉटेलमध्ये दोन्ही नेते शनिवारी संध्याकाळी सहा वाजल्यापासून उपस्थित होते. त्यामध्ये अर्धा ते एक तास या दोन्ही नेत्यांमध्ये चर्चा झाल्याची चर्चा सुरू आहे.

देवेंद्र फडणवीस आणि आदित्य ठाकरे हे त्यांच्या वेगवेगळ्या कार्यक्रमासाठी सोफिटेल हॉटेलला गेले होते. सुरुवातीला आदित्य ठाकरे या हॉटेलमध्ये पोहोचले आणि नंतर एक तासाभराच्या अंतराने देवेंद्र फडणवीस पोहोचले. हे दोन्ही नेते साडेचार तासाहून अधिक वेळ या हॉटेलमध्ये होते.

# दहा जणांचा ग्रुप समुद्रात पोहायला उतरला, चार जणांचा मृत्यू

**रत्नागिरी (प्रतिनिधी)–** रत्नागिरीतील आरेवारे समुद्रात पोहण्यासाठी उतरलेल्या चार पर्यटकांचा बुडून मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. आरे वारे समुद्रात बुडालेले चारही पर्यटक रत्नागिरी शहरातील ओसवाल नगर येथील रहिवासी असल्याची माहिती समोर आली आहे. बुडालेल्या चार पर्यटकांपैकी तीन पर्यटक महिला तर एक पुरुष आहे.

रत्नागिरी तालुक्यात मागील काही दिवसांपासून पावसाची उघडीप असल्याने समुद्रकिनारी पर्यटनासाठी जाणाऱ्या पर्यटकांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. शनिवार आणि रविवार या दिवशी आरे वारे समुद्र किनारी पर्यटनासाठी जाणाऱ्या पर्यटकांची संख्या अधिक आहे.

शनिवारी सायंकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास ओसवाल नगर येथून आरे वारे समुद्र येथे पर्यटनासाठी आलेले चार पर्यटक बुडाल्याची घटना घडली. या चार जणांमध्ये जुनेद बशीर काझी (३० ओसवाल नगर), जैनब जुनेद काझी (२८ ओसवाल नगर) उजमा समशुद्दीन शेख (१७ मुंबई मुंब्रा) उमेरा शमशुद्धीन शेख (१६ मुंब्रा) बुडालेल्या चार पर्यटकांपैकी दोन पर्यटक हे नुकतेच मुंबई येथून आले होते. समुद्रात उरलेल्या नंतर पाण्याचा अंदाज न आल्याने चारही जण पाण्यात बुडाले. अवघ्या काही मिनिटांत चारही जण खोल समुद्रात बुडाल्याने चारही जणांचा बुडून मृत्यू झाला. या घटनेची माहिती स्थानिक पोलीस पाटील आदेश कदम यांनी ग्रामीण पोलीस निरीक्षक यांना माहिती दिली. चारही पर्यटकांना स्थानिक ग्रामस्थ आणि पोलिसांच्या मदतीने जिल्हा रुग्णालयात हलवण्यात आले.

# लोकप्रिय तेलुगू अभिनेते फिश वेंकट यांचे निधन



**हैदराबाद (प्रतिनिधी)–** लोकप्रिय तेलुगू अभिनेते आणि विनोदी कलाकार फिश वेंकट यांचे निधन झाले आहे. मूत्रपिंड आणि यकृत निकामी झाल्यामुळे त्यांचे निधन झाले. त्यांचे खरे नाव हे वेंकट राज होते. दरम्यान, ते अनेक महिन्यांपासून नियमित डायलिसिसवर होते. अलीकडेच त्यांची प्रकृती खालावली होती. त्यांनाव्हेंटिलेटरवर ठेवण्यात आले होते. गेल्या काही दिवसांपासून त्यांच्यावर हैदराबादमधील खासगी रुग्णालयात आयसीयूमध्ये उपचार सुरु होते.

# छत्तीसगडचे माजी मुख्यमंत्री भूपेश बघेल यांच्या मुलाला ईडीकडून अटक

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** अखेर दारू घोटाळा प्रकरणात सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) अखेर कायद्याचा बडगा उचलला. ईडीने छत्तीसगडचे माजी मुख्यमंत्री भूपेश बघेल यांचा मुलगा चैतन्य बघेल याच्यासह इतर आरोपींविरोधात मोठी कारवाई केली. १८ जुलै रोजी भिलाई येथील चैतन्य बघेल यांच्या निवासस्थानी सर्च ऑपरेशन राबवण्यात आले. सूत्रांच्या माहितीनुसार, ईडीच्या हाती काही महत्त्वपूर्ण कागदपत्रे लागली. त्यानंतर बराचवेळ चौकशी झाली. धाड टाकल्यानंतर थोड्याच वेळात चैतन्य याला अटक करण्यात आली.

ईडीने रायपूरमध्ये माजी मुख्यमंत्री भूपेश बघेल आणि त्यांचा मुलगा चैतन्य बघेल याच्याविरोधात दारू घोटाळ्यात कारवाई केली. भूपेश बघेल यांच्या घरासह इतर अनेक ठिकाणी छापेमारी करण्यात आली. या दरम्यान ईडीने इतर घोटाळ्यासंबंधीत काही कागदपत्रे जप्त केली. त्यांनी चैतन्य बघेल याची चौकशी केली. त्याच्याकडून कुठलेही समाधानकारक उत्तर न मिळाल्याने चैतन्य याला ताब्यात घेण्यात आले.









# आशिया कप : भारत बहिष्काराच्या तयारीत?

**मुंबई (प्रतिनिधी)–** आशिया कप २०२५ ही स्पर्धा येत्या सप्टेंबरमध्ये नियोजित होणार आहे. मात्र भारताच्या सहभागावर सध्या मोठं प्रश्नचिन्ह निर्माण झालं आहे. २४ जुलै रोजी ढाका, बांगलादेशमध्ये एशियन क्रिकेट काउंसिल (एसीसी)ची महत्त्वपूर्ण बैठक होणार आहे. पण, बीसीसीआयने स्पष्ट शब्दांत सांगितलं आहे की, जर ही बैठक ढाकामध्येच झाली, तर ते या बैठकीतील कोणत्याही निर्णयाचा स्वीकार करणार नाहीत आणि स्पर्धेवर बहिष्कार टाकतील.

मिळालेल्या माहितीनुसार, बीसीसीआयने एसीसी आणि पाकिस्तान क्रिकेट बोर्डाचे अध्यक्ष मोहसिन नक़्वी यांना कळवले आहे की, ढाकामध्ये जर आशिया कपसंदर्भातील बैठक झाली, तर बीसीसीआय त्यामधून काढता पाय घेईल. भारत आणि बांगलादेश यांच्यातील सध्याचे राजकीय संबंध तणावपूर्ण असल्यामुळे बीसीसीआयने हा निर्णय घेतला आहे.

आशिया कप तेव्हाच खेळवला जाईल, जेव्हा एसीसीची बैठक ढाक्याऐवजी दुसऱ्या ठिकाणी घेतली जाईल. मोहसिन नक़्वी भारतावर अनावश्यक दबाव आणत आहेत. स्थान बदलण्यासाठी त्यांना वेळेवर कळवले होते, पण अजून काही उत्तरच मिळालेले नाही. त्यामुळे जर बैठक ढाकामध्येच झाली, तर भारत कोणत्याही निर्णयाचा स्वीकार करणार नाही.

मिळालेल्या माहितीनुसार, श्रीलंका, अफगाणिस्तान आणि ओमान यांनीही ढाकामध्ये होणाऱ्या बैठकीला नकार दिला आहे. तरीदेखील मोहसिन नक़्वी आपल्या भूमिकेवर ठाम आहेत. एसीसीच्या नियमानुसार, भारतासारखा प्रमुख देश जर बैठकीत उपस्थित नसेल, तर घेतलेला कोणताही निर्णय वैध मानला जाणार नाही. त्यामुळे आता बैठकीला फक्त काही दिवस शिल्लक असताना, एसीसीवर निर्णय घेण्यासाठी मोठा दबाव आहे.

आशिया कप सप्टेंबर २०२५ मध्ये होणार आहे. मात्र जर सध्याच्या घडामोडी अशाच सुरू राहिल्या, तर ही स्पर्धा स्थगित होण्याची किंवा रद्द होण्याची शक्यता नाकारता येत नाही. बीसीसीआय हा एसीसीचा सर्वात महत्त्वाचा सदस्य आहे आणि त्यांच्याविना ही स्पर्धा अपूर्ण ठरू शकते. एकंदरीत, आगामी काही दिवस आशिया कपच्या भवितव्यावर निर्णायक ठरणार आहेत.

# कांदा खरेदीतील भ्रष्टाचार रोखण्यासाठी दक्षता समितीची स्थापना

**मुंबई (प्रतिनिधी)–** महाराष्ट्रातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांसाठी एक महत्त्वाची बातमी आहे. कांदा खरेदीतील भ्रष्टाचार रोखण्यासाठी राज्य शासनाने मोठा निर्णय घेतला आहे. केंद्रीय नोडल संस्थांच्या खरेदी केंद्रांवर आता राज्य शासनाचे नियंत्रण असणार आहे. नाफेड आणि एनसीसीएफच्या केंद्रावर दक्षता समिती नेमण्याचा शासन निर्णय जारी करण्यात आला आहे.

राज्यातील एकूण १३ केंद्रांवर समितीची स्थापना करण्यात आली आहे. महसूल, पणन विभाग, कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांचा समितीमध्ये असणार समावेश आहे. या दोन्ही संस्थांकडून केल्या जाणाऱ्या कांदा खरेदीत गैरव्यवहार होत असल्याच्या शेतकरी तसेच शेतकरी संघटनांकडून तक्रारी शासनाकडे प्राप्त झाल्या होत्या. सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाने १८ जुलै, २०२५ रोजी शासन निर्णय जारी करत खरेदी केंद्रांवर दक्षता पथके नियुक्त केली आहेत.

# आजोबा व एक नातू...

कथा



आजोबा आणि नातू हे समिकरण फार जुनं आहे. 'जुनं ते सोनं' हे निश्चितच नातवास कळत असावं. आई-वडिलांना कामाच्या व्यापामुळे कदाचित वेळ देता येत नसेल. पण नातवाचा वेळ आजोबासाठी व आजोबाचा वेळ नातवासाठी नेहमीच राखीव असतो. जेव्हा वय जसजसं झुकायला लागतं, तेव्हा आजोबाचं बाप म्हणून महत्त्व संपतं. आजोबा होऊन नातवासाठी उरलेलं अख्खं आयुष्य बागडत असतं. वय, मानपान व अहंकार सोडून आजोबा बालपण स्वीकारत असतो. आजोबा आणि नातू हे मित्र बनून जातात. आजोबाची काठी, आजोबाचा चष्मा, आजोबाचा श्वास म्हणजे नातू असतो. फिरायला जायचं आजोबा सोबत. कामात अडथळा निर्माण करणारं मूल व निकामी झालेले वडील कर्त्या पिढीचे अडथळे बनतात. त्यांच्याविषयी मुलांमध्ये अपसूक अनस्था निर्माण होत राहते.

बालपणापासूनच आयुष्य घड-विण्यासाठी बापाने घेतलेले सारे कष्ट विसरायला लागतात. अपंग बाप, बिमार आई-बाप आणि थकलेले आई-बाप आश्रमाकडे सुपूर्द केले जातात. नातवाची व आजोबाची गट्टी तुटल्या जाते. अविवेकी मुलगा बाईल विचारातून बायकोचा गुलाम बनतो. क्षणात जन्मापासून आई-वडिलांशी असलेली घट्ट नात्याची नाळ एका मिनिटात तोडून टाकतो. आई- बाप आश्रमात जावून पोरकेपणाचे जीवन कंठत असतात. भुतकाळ व जीवनातील चांगल्या कर्माचे वाईट ओझे सहण करत असतात. कोणताच गुन्हा न करताही विचाराचे ओझे घेऊन आई-वडील विकाराने पछाडतात आणि आश्रमरूपी तुरूंगात कैदी बनून राहातात.

हे सारं घरात बारकाईने नातू टिपत असतो. आजोबासारखा मित्र तुटतो. या बंदडोर संस्कृतीत आजोबासारख्य दुसरा मित्र त्यास खेळण्यासाठी मुळीच नसतो व मिळतही नाही. तो एकटा आजी-आजोबाच्या आठवणीने झुरत राहतो.

एकदा शाळेत त्याच्या वर्गात 'आपल्या आवडत्या व्यक्ती' असा निबंध लिहायला दिला जातो. तो आजोबावर भरभरून लिहितो. तो निबंध सुंदर व प्रभावी ठरतो. विचार करावयास प्रवृत्त करतो. नातवास प्रिय असलेला आजोबा वडिलास कसा अप्रिय होतो? हेच मुख्य गुपित आजपर्यंत कोणासही कळत कसे नाही? हा प्रश्न मुख्य प्रश्न बनून वैचारिक पातळीवर चर्चिला जातो. उकल कधीच होत नाही.

पुन्हा एकदा वर्गात सर्वांना एक सुंदर प्रतिकृती बनवून आणायला सांगितली जाते. कोन्ही मंदीर, कोन्ही ताजमहल, कोन्ही किल्ला, कोन्ही शाळा अशा सुंदर प्रतिकृती बनवतात. हा नातू मात्र स्वकल्पित एक सुंदर स्वप्नातलं घर बनवतो. हा त्या कृतीत ईतका मश्गूल व रममाण असतो; की शेवटच्या टप्प्यातील सजावटीत त्यास शाळेत जाण्याची वेळही लक्षात येत नाही. त्यास शाळेत जाण्याची आठवण सुद्धा राहात नाही.

शाळेतून फोन येतो तुमचा मुलगा शाळेत आलेला नाही. आज प्रोजेक्टचा शेवटचा दिवस तो सादर ही केलेला नाही. आई वडील ऑफिसला कामावर निघालेले असतात. जाता जाता ते मुलाला शाळेत सोडण्यासाठी त्याच्या सोबत जातात.

आई-वडील त्यास घाईघाईत शाळेत घेऊन जातात. गेल्या गेल्याा गेल्याच मुलाच्या प्रोजेक्टच्या सादरीकरणाचं आलाउन्सिंग होतं.

आई-वडील विचार करतात, 'कार्यालयात जाण्यासाठी वेळ झाला तरी चालेल, पण मुलांचं सादरीकरण ऐकूनच जावू म्हणून ते दोघे तेथे थांबतात'. बनवलेल्या सुंदर प्रतिकृतीचे तो सादरीकरण करत असतो. तो त्या कृतीस नाव देतो 'सुंदर घराचं स्वप्न'. हॉल, किचन, ऑफिस अशी एक एक माहिती तो सांगत असतो. शेवटी एका सुंदर रुमची माहिती व वैशिष्ट्ये सांगतो. त्या अत्याधुनिक रूम माझ्यासाठी नसून फक्त माझ्या आजी-आजोबासाठी असेल. त्याचं सुंदर सादरीकरण संपवते.

परीक्षक त्यास प्रश्न विचारतात, 'तुझ्या बंगल्याच्या शेजारी वेगवेगळे हॉल दाखवले आहेस. खूप झाडे आणि मोठे पटांगण हा विस्तृत भाग कशासाठी आहे? त्यावर त्या चौथीतल्या मुलाने उत्तर दिलं, 'मी आणि माझे आजोबा खूप चांगले मित्र, पण आजी-आजोबास वृद्धाश्रमात जावे लागले. मला घरी एकट्यास आजोबा नसल्याने खूप कंटाळवाणे वाटायला लागते. आजी - आजोबास घरी आणण्यासाठी मी ही वरची सुंदर रुम बनवली. बगल्या शेजारच्या जागेत मी एक वृध्दाश्रम बनवणार आहे. त्यामुळे माझ्या आई-वडिलांना आजी-आजोबासारखे दूर जावे लागणार नाही. ते घराच्या शेजारी व जवळच माझ्या देखरेखीतच राहतील.'

कार्यक्रमातील सर्वांनी त्या छोट्याश्या मुलासाठी खूप टाळ्या वाजवल्या व तोंडभरून कौतुक केलं. कामावर जाताना त्यास सोडावयास आलेले आई-वडील खजिल झाले.


त्यांना त्यांच्या चुकीचा खूप मोठा पश्चाताप झाला. त्यांच्या डोळ्यातून अश्रूंचे महापूर वाहू लागले. मुलांच्या निर्विकार निर्मळ सात्विक भावनेने त्यांचे डोळे कायमचे उघडले.

ऑफिसात कामावर जावयाचे सोडून ते थेट वृद्धाश्रमात गेले. आई-वडिलांना माफी मागून त्यांना घरी घेऊन आले. त्याचं बोलनं सहजच होतं, पण आई वडिलांना व सर्वांना संदेश देणारं, लहान मनाचं निखळ भावविश्व वाटल. सर्वांना मनातून भावलं. मनातूस हेलावलं. विचार करायला आत्मप्रवृत्त केलं. जे घडलं ते निर्मल आणि निर्विकार होतं. तेथे आई - वडिल याांना. त्यांच्या कर्माची बोच त्यांना मान खाली घालायला लावणारी होती. अनैक प्रवचने ऐकून बोध झाला नसताना पण मुलांने झण-झणीतणे आई - बापाचे डोळे उघडले होते. आजी आजोबापासून नातवास तोडणाऱ्या सर्व आई-बापास हा बोध आत्मपरीक्षण करायला लावणारा होता हे निश्चितच..

आपण जे करतो ते कधीतरी असेच आपणास अचानक येऊन भेटते. आपण जे करतो तेच आपणास भरावे लागते याचा प्रत्यय आई-बापास प्रत्यक्ष आला होता.

**- व्यंकटेश सोळंके,**
नांदेड
मो. ९९२२६५४७३२

# राष्ट्रनिष्ठा जागे करणारे प्रवासवर्णन : थर्टी डेज इन म्युनिक




पुस्तक परीक्षण

प्रा. डॉ. व्यंकटी पावडे
मराठी विभागप्रमुख,
केआर महिला महाविद्यालय, नांदेड
मो. ९६५७२७८२१७

सुप्रसिद्ध डॉ. यशवंत चव्हाण व त्यांच्या स्नुषा डॉ. सौ. अरिया सुयश चव्हाण लिखित थर्टी डेज इन म्युनिक हे शंभर पृष्ठांचे वाचनीय प्रवासवर्णन, नांदेड येथील लेखक व प्रकाशक निर्मलकुमार सूर्यवंशी यांच्या निर्मल प्रकाशनाने नुकतेच प्रकाशित केले आहे. डॉ. गोविंद नांदेडे यांच्या मलपृष्ठावरील अभिप्रायाने या ग्रंथाचे सजीवपण अधिक बोलके झाले आहे. जगाच्या पाठीवर बलाढ्य राष्ट्र म्हणून ओळख असणाऱ्या जर्मनी या देशाची तेथील आल्हाददायक जीवनानुभवासह ओळख करून देणाऱ्या या प्रवासवर्णनाचे प्रकाशन नांदेड येथे, कुलगुरू डॉ. उद्धव भोसले, आंबेडकरवादी मिशनचे प्रमुख दीपक कदम, विशेष पोलीस महानिरीक्षक शशिकांत महावरकर, जिल्हाधिकारी अभिजीत राऊत, जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, पोलीस अधीक्षक सोमेय मुंडे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक अविनाश कुमार, माजी शिक्षण संचालक गोविंद नांदेडे, लक्ष-वेध फाउंडेशनचे एकनाथ मोरे आदी मान्यवरांच्या हस्ते आज होणार आहे. त्यानिमित्ताने या ग्रंथाची ओळख करून देणारा हा लेखन संवाद.

मराठी साहित्यामध्ये विविध वाड्.मय प्रकार आहेत. त्यातील प्रवासवर्णन हा एक वेगळा वाड्.मय प्रकार आहे. काही निवडक लेखकांनी हा वाड्.मय प्रकार हाताळलेला आहे. भली मोठी परंपरा या वाड्.मय प्रकाराला नाही. त्याचे कारण असे आहे की, भारतीय माणूस हा प्रवासवेडा नाही. पाश्चिमात्य पर्यटकांच्या तुलनेत भारतीय माणूस कमी प्रवास करतो. देशांतर्गत भक्तीस्थळे पाहणारा हा माणूस फारसा विदेश प्रवास-ाला जात नाही. त्याची कारणे अनेक आहेत. त्यामुळे आंतरराष्ट्रीय प्रवासापासून तो कोसोदूर आहे. डॉ. यशवंत चव्हाण आणि डॉ. सौ. अरिया सुयश चव्हाण लिखित थर्टी डेज इन म्युनिक हे प्रवासवर्णन जर्मनीतील म्युनिक या शहराची, तेथील प्रेमळ माणसांची, अद्भुत स्वच्छतेची, वाहतूक व्यवस्थेची, जर्मनीतील राहणीमानाची, परिवर्तनवादी संस्काराची, निसर्गाची, तेथील रीतीरिवाज प्रथापरंपरांची व अल्हाददायक जीवनाची ओळख करून देणारे आहे.

डॉ. यशवंत चव्हाण व डॉ. सविता चव्हाण (पत्नी) यांचा हा दुसरा ग्रंथ आहे. मिशन यूपीएससी हा त्यांचा पहिला ग्रंथ. त्यांचा मुलगा डॉ. सुयश चव्हाण जर्मनीमध्ये भारतीय दूतावास विभागामध्ये कार्यरत आहे. भारत मातेच्या सेवेसाठी तो आपले कर्तव्य प्राण-पणाने बजावतो, हे कर्तव्य पार पाडताना त्याच्या मनात जाज्वल्य राष्ट्रनिष्ठा भरलेली आहे. कर्तव्यपरायण असण-ारा हा अधिकारी तेवढाच कुटुंबवत्सल आहे. आई-वडील बहीण (डॉ. स्नेहल) व प्रेयसी असणारी पत्नी (डॉ. अरिया) यांची खूप काळजी करणारा तो एक प्रेमळ माणूस आहे. या प्रेमळ मुलाकडे राहण्यासाठी व जर्मन या देशाची सफर करण्यासाठी, तीस दिवसांकरिता हे भारतीय कुटुंब तेथे गेले. या तीस दिवसांत जर्मन देशाचा जो स्वर्गीय अनुभव त्यांना आला. त्या सर्व क्षणांचे यथोचित वर्णन म्हणजे थर्टी डेज इन म्युनिक हे प्रवासवर्णन आहे. या प्रवास वर्णनात एकूण एकोणवीस प्रकरणे आहेत.

म्युनिक शहर, जिनिव्हा (स्वित्झर्लंड) टूर, इंग्लिशर गार्डनला भेट, मरीन प्लीज, ओलंपिया टॉवर ही प्रकरणे वाचताना वाचकाला जर्मनीत फिरल्याचा दिव्य अनुभव येतो. या ग्रंथातील लेखकाने प्रसंगानुरूप दिलेले फोटो आशयाची व्याप्ती वाढवतात आणि वाचकांचे मन ग्रंथ वाचनासाठी वळवून घेतात. या ग्रंथामध्ये एक वेगळेपणा आहे. नव्या तंत्रज्ञानाचा अनोखा वापर यामध्ये दिसतो, क्यूआर कोड या नव्या सिस्टीममुळे जर्मनी आणि म्युनिक शहरा-तील अनेक चित्रे व व्हीडीओ पाहताना मन भरून येते. प्रेरक व दिशादर्शक असणारे हे प्रवासवर्णन डॉ. यशवंत चव्हाण यांच्या संवेदनशील मनाची साक्ष देण-ारे आहे. जर्मनी या देशाचे, म्युनिक या शहराचे व तेथील स्थळांचे वर्णन करताना अनेक प्रसंगाचे अतिशय सूक्ष्मपणे त्यांनी निरीक्षण केले आहे. अल्हाददायक निसर्ग, हिरव्या वनराईने फुललेला डोंगराळ भाग, देशाला पुढे नेण्यासाठी समर्पण वृत्तीने काम करणारे, वेळ पाळणारे दिनचर्यमध्ये व्यस्त असणारे जर्मन नागरिक, तेथील मॉलसंस्कृती, स्वच्छता, वाहन व्यवस्था, जर्मन भाषाभिमान बाळगणारे लोक आदी सर्व घटनागोष्टींचे लेखकाने केलेली वर्णने जर्मनी या देशाची नव्याने ओळख करून देणारे आहे. ही ओळख करून देताना लेखकाच्या मनात भारत मातेबद्दल नितांत आदर आहे. प्रगत जर्मनी हा देश पाहून आपला देश पुढे जावा यासाठी डॉ. यशवंत चव्हाण यांचे मन पानोपानी कळवळताना दिसते.

अत्यंत इमानदारीने व राष्ट्रनिष्ठेने काम करणारे तेथील लोक खूप कष्टप्रिय आहेत. ते आपला ईश्वर कामात शोधतात. कार्यतत्परता त्यांच्याकडून शिकावी. तेथे बहुतांश गोष्टी ऑनलाइन ॲपच्या माध्यमातून केल्या जातात. पन्नास लाख किंमत असणारी ऑडी गाडी तेथे दर दिवस पंधरा हजार रुपये प्रमाणे भाड्याने मिळते. बालके, शालेय विद्यार्थी, युवक, स्त्री पुरुष, वृद्ध नागरिक यांच्यासाठी मोफत खेळाची मैदाने आहेत. वाहनांची गर्दी कुठेही नाही. स्वयंशिस्तीने लोक कायद्याचे पालन करतात; त्यामुळे पोलीस स्टेशनची संख्या नगण्य आहे. जिनिव्हा (स्वित्झर्लंड) भेट, या प्रकरणांमध्ये त्यांनी स्वच्छ हॉटेल्स, घनदाट झाडीचे पर्वत, जंगलातील अवघड ठिकाणे, वळणदार रस्ते, रम्य निसर्ग यांचे वर्णन केले. माल्टा व आल्फ्रेड या शेतकरी कुटुंबाचा गाईचा अत्याधुनिक गोठा व पॉलिहाऊस यांचे वर्णन करून त्याचा प्रत्यक्षदर्शी व्हीडीओ क्यूआर कोडच्या माध्यमातून रसिकांपर्यंत पोहोचविला. हे या प्रवासवर्णनाचे वेगळे वैशिष्ट्य सांगता येईल. असे अनेक व्हीडीओ स्कॅन करून पाहताना खूप आनंद वाटतो.

म्युनिक शहरातील इंग्लिशर गार्डन अत्यंत मनमोहक आहे. तेथील तळ्यात बदके व राजहंस आनंदाने विहार करतात. पादचारी, सायकलस्वार व कारचालक यांना रस्त्यावर स्वतंत्र ट्रॅक आहेत. ते सर्व नागरिक वाहतुकीचे नियम कडक शिस्तीने पाळतात. तेथील नागरिक आपल्या मुलांना सायकल ट्रॅकवरून बिनधास्तपणे सायकल चालवायला देतात. सायकल चालवणे हे तेथे महत्त्वाचे मानले जाते. त्यामुळे कुठेही प्रदूषण दिसत नाही. आपण भारतीय याच्या संपूर्ण विरुद्ध वागतो ही लेखकाने व्यक्त केलेली खंत सत्य आहे. स्मोकिंग झोनमध्ये तेथील स्त्री-पुरुष सिगारेट ओढतात, ऑक्टोबर फेस्टिवल हा तेथील लोकांचा बियर पिण्याचा फेस्टिवल आहे. म्युनिक शहरातील वाहनांची पार्किंग व्यवस्था अत्यंत शिस्तबद्ध आहे. जर्मनीतील स्पोर्ट व्यवस्था देशाला अनेक पदके जिंकून देणारी आहे. तेथील तीन कोटी लोक ९१ हजार स्पोर्ट क्लबचे सभासद आहेत. शालेय शिक्षणाबरोबर तेथील लहान मुलांना करिअर करण्यासाठी एक आवडीचा खेळ खेळण्यासाठी प्रोत्साहन दिले जाते. त्यासाठी ठिकठिकाणी मोफत खेळाची मैदाने व भरपूर साहित्य आहे. मरीन प्लाज, ओलंपिया टावर, बीएमडब्ल्यू कार, युनिक एअरपोर्ट या स्थळांची लेखकांनी केलेली निरीक्षणे त्यांच्या संवेदनशील व सूक्ष्म अवलोकनाची साक्ष देतात.

डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम असे म्हणाले हो-ते, एक पेन, एक शिक्षक आणि एक चांगला ग्रंथ हे जग बदलण्यासाठी पुरेसे आहेत. म्हणून भारतीय माणसाचे मन परिवर्तन करण्यासाठी हा ग्रंथ पुरेसा आहे. एका नव्या अपरिचित जर्मन जगाची ओळख करून देणारे हे प्रेरणादायी प्रवासवर्णन मराठी साहित्य परंपरेत दिशादर्शक स्थान निर्माण करेल यामध्ये दुमत नाही. हे प्रवासवर्णन म्हणजे नांदेड जिल्ह्यातील नायगाव (महाराष्ट्र) ते जर्मनी या सात हजार पाचशे किलोमीटर अंतराचा सुखकारक प्रवास नाही तर एका यशस्वी देशसेवा करणाऱ्या डॉ. सुयश चव्हाण या मुलाची यशोगाथा आहे. यातील १९ प्रकरणे जर्मन देशातील विविध गोष्टींचा उलगडा करणारी आहेत. थर्टी डेज इन म्युनिक या प्रवासवर्णनातून भारतीय माणसांच्या मनात निश्चित राष्ट्रनिष्ठा व प्रेम जागृत होईल असे वाटते. म्हणून या प्रेरणादायी प्रवासवर्णनाचे मराठीतील वाचक, रसिक, लेखक आणि समीक्षक स्वागत करतील ही मनोमन आशा आहे. भावी लेखनासाठी डॉ. यशवंत चव्हाण यांना खूप खूप शुभेच्छा.

**संदर्भ : थर्टी डेज इन म्युनिक,**
**डॉ. यशवंत चव्हाण,**
**डॉ. सौ. अरिया सुयश चव्हाण,**
**निर्मल प्रकाशन नांदेड,**
**पृष्ठ-शंभर,**
**मूल्य चारशे.**

# ट्रम्प यांच्या हुकुमशाही विरोधात जनता रस्त्यावर



अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प सत्तेवर येऊन जेमतेम सहा महिने झाले. या सहा महिन्यातच अमेरिकन जनता त्यांना वैतागली असल्याचे दिसून येत आहे. ज्या अमेरिकन जनतेने सहा महिन्यापूर्वी डोनाल्ड ट्रम्प यांना भरभरून मते देऊन राष्ट्राध्यक्ष बनवले तीच अमेरिकन जनता आता त्यांच्या विरुद्ध रस्त्यांवर उतरून आंदोलने करीत आहे. विशेष म्हणजे ही आंदोलने फक्त एका शहरात किंवा राज्यात होत आहेत असे नाही तर अमेरिकेतील सर्व शहरात होत आहेत आणि त्यात लाखो अमेरिकन नागरिक सहभागी होत आहेत.

नुकतेच स्थलांतरितांना हद्दपार करणे आणि गरिबांसाठी मेडिकेम सुविधा कमी करणे याविरोधात १६०० हून अधिक ठिकाणी अमेरिकन नागरिकांनी निदर्शने केली. आंदोलकांनी या आंदोलनाला गुड ट्रबल लाईव्हज ऑन असे नाव दिले. शिकागो हे या आंदोलनांचे मुख्य केंद्र होते. या आंदोलनात लाखो नागरिक रस्त्यावर जमले. सर्वांनी हातात मेणबत्ती घेऊन मोर्चा काढला. हे आंदोलन शांततेत पार पडले तरी या आंदोलनात आंदोलकांनी ट्रम्प यांच्या विरोधात रोष व्यक्त केला.

पब्लिक सिटिझन ग्रुपच्या सह - अध्यक्षा लिसा गिल्बर्ट यांनी सांगितले की आपण आपल्या देशाच्या इतिहासातील भयानक काळातून जात आहोत. सरकारमध्ये वाढत्या हुकूमशाही वृत्तीचा आणि कायद्याच्या उल्लंघनाचा सामना करत आहोत, जो आपल्या लोकशाही स्वातंत्र्याला आणि अधिकारांना आव्हान देत आहे. या हुकुमशाही प्रवृत्तीविरुद्ध हे आंदोलन आहे. अर्थात ट्रम्प यांच्या हुकुमशाही प्रवृत्तीविरुद्ध अमेरिकन नागरिकांनी केलेले हे पहिलेच आंदोलन नाही. मागील महिन्यातच अमेरिकन नागरिकांनी असेच एक मोठे आंदोलन केले होते.

आंदोलकांनी त्या आंदोलनाला 'हॅण्डस ऑफ' आंदोलन असे नाव दिले होते. ते आंदोलन लोकशाहीसाठी असल्याचे सांगितले गेले. त्या आंदोलनात अमेरिकेतील दीडशे पेक्षा जास्त गटांनी सहभाग घेतला होता त्यात सामाजिक हक्क संघटना, कामगार संघटना, एलजीबिटीक्यू प्लस समर्थक गट, सामाजिक आणि लोकशाहीवादी गटांचा समावेश आहे. राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या विरोधातील ते आंदोलनही शांततेत पार पडल्याने कोणालाही अटक करण्यात आली नव्हती मात्र त्या आंदोलनामुळे अमेरिका आणि डोनाल्ड ट्रम्प यांची जगभर अप्रतिष्ठा झाली होती. आताही तेच झाले. सह महिन्यांपूर्वी ज्या डोनाल्ड ट्रम्प यांना जनतेने सत्तेवर बसवले त्यांच्याच विरोधात जन-तेला रस्त्यांवर का उतरावे लागत आहे असा प्रश्न विचारला जात आहे. त्याचे उत्तर आहे ट्रम्प यांचा एककल्ली आणि मनमानी कारभार.

राष्ट्राध्यक्ष पदाची शपथ घेतल्यापासून डोनाल्ड ट्रम्प यांनी निर्णयांचा धडाका लावला आहे पण हे निर्णय घेताना त्यांनी अनेकांना दुखावले आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी इतर देशा-तून आयात होणाऱ्या मालांवर भरमसाठ कर लावला आहे. हे करताना त्यांनी अमेरिकेचेच भले होणार असे जनतेला ठासून सांगितले आहे. डोनाल्ड ट्रम्प यांच्या या निर्णयाला मेक्सिको, चीन, भारत, कॅनडा या देशांनीही जशास तसे उत्तर देऊन अमेरिकेतून आयात होणाऱ्या मालांवर तितकाच अतिरिक्त कर लावला आहे त्यामुळे जगात व्यापार युद्धाला तोंड फुटले आहे याचा परिणाम जितका जगावर होणार आहे तितकाच तो अमेरिकेवर देखील होणार आहे. या व्यापार युद्धामुळे अमेरिकन बाजारपेठेत मंदी येण्याची भीती तेथील तज्ज्ञ व्यक्त करत आहेत.

जर अमेरिकेत मंदी आली तर अमेरिकेत महागाई वाढेल त्याचा फटका तेथील सर्वसामान्य नागरिकांनच बसेल त्यामुळे डोनाल्ड ट्रम्प यांचा हा निर्णय तेथील सर्वसामान्य लोकांना पटलेला नाही. केवळ हा एकमेव निर्णय नाही तर गेल्या काही दिवसात ट्रम्प यांनी घेतलेले अनेक निर्णय जनतेच्या पचनी पडले नाहीत त्यात हजारो केंद्रीय कर्मचाऱ्यांची कपात, सामाजिक सुरक्षा व्यवस्थापन कार्यालये बंद करणे, मदत एजेंसी बंद करणे, स्थलांतरितांना हद्दपार करणे, तृतीय पंथीयांच्या कामाच्या संधी कमी करणे, आरोग्य कार्यक्रमांच्या निधीमध्ये कमी करणे हे आणि यासारखे अनेक निर्णय अमेरिकेतील जनतेला पटले नाहीत या निर्णयांना विरोध करण्यासाठीच अमेरिकन जनता रस्त्यावर उतरत आहे. जनतेचा वाढता रोष कमी करण्यासाठी व्हाईट हाऊस पुढे सरसावली आहे मात्र त्याचा आंदोलकांवर कोणताही परिणाम होताना दिसत नाही.

आंदोलनाची धग वाढतच चालली आहे. एककल्ली, मनमानी कारभार केला तर जनता ती खपवून घेत नाही हेच या आंदोलनातून अमेरिकन जनतेने दाखवून दिले आहे. हे आंदोलन जर असेच चालू राहिले तर डोनाल्ड ट्रम्प यांना जनतेपुढे झुकावेच लागेल आणि आपल्या एककल्ली स्वभावाला मुरड घालून जनतेच्या हिताचे असे सर्वसमावेशक निर्णय घ्यावे लागेल.

**-श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२५४६२९५

## आषाढाच्या उंबरठ्यावर...

आला श्रावण आता
तरी...तू अबोल आहे
आषाढाच्या उंबरठ्यावर
हृदयी घाव सखोल आहे

मी बोलून गेले सारे
तू अजुनही मुक आहे
शब्दांच्या वंचनेतही कीती
सलते अमाप दुःख आहे

अस्वस्थ या मनाने
जरी टाळले तुला आहे
नकळत माझ्याही मी
तरी भाळले कैकदा आहे

उसवून गेल्या श्वासाला
आठवणींचा गंध आहे
कसे सावरु सांग आता?
लागला तुझाच छंद आहे

**-रुपाली वागरे/वैद्य**
नांदेड
मो. ९८६०२७६२४१

## बळ

चहुबाजुनीं
संकटाने घेरलेलं असते
म्हणून जेव्हा कधी
खचून खाली बसतो
त्या वेळला
कुठेच काही दिसत नाही
अशावेळी
डोळ्यावर अंधारी येते
मस्तक गुंगायला लागते
शंतता पसरलेली दिसते सगळीकडे
आशेचा किरण सुद्धा
मावळेला दिसतो
त्या क्षणाला वाटतं आता करावं?
कारण हातबल झालेला असतो
तेवढ्यात
स्वतः ला थोडे सावरून घेतो
शंभुराजांच्या
इतिहासातला
एखादा प्रसंग आठवुण घेतो
मग, खाडकण
उठून उभा ठाकतो
बुलंद होतात बाहू
मस्तकात ताडकण वीज चमकते
तेव्हा कोंडलेल्या वाटेवरचं पाणी
हळूहळू निस्तरायला लागते
बाजुला होतात काटे
अन समोर
जळालेल्या संकटाची राख दिसते
राजांच्या चरणी
न कळत मुजऱ्याला मान झुकते
अन् आपोआप अंगात बळ येते

**- गोविंद कवळे**
इळेगाव ता. उमरी जि. नांदेड
मो. ७३८७२६७२१९

## शाळा

उघड्यावर भरली, मुलांची शाळा
शाळेत आला, काळा कावळा
कावळा म्हणाला, मित्र माझा फळा
मुलांनो तुम्ही, छान चित्र काढा
खडूने ओढल्या, वेड्यावाकड्या रेघा
रेघांची झाली, छान चित्र बघा!

**-प्र. श्री. जाधव**
नांदेड
मो.८८०५८३६२०७

## थोडक्यात...

### गायीने गवत खाल्ल्याने एकाला जबर मारहाण

**नांदेड (प्रतिनिधी)–** शेताशेजारील धुऱ्यावरील गवत गायीने खाल्ल्याच्या कारणावरून शेतकऱ्याला मारून हात फ्रॅक्चर करणाऱ्या एकाविरुद्ध बारड ठाण्यात पोलीस गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

बारड येथील अनिकेत गजानन लोमटे यांच्या गायीने त्यांच्या शेजारी असलेल्या आशिष शंकर लोमटे यांच्या धुऱ्यावरील गवत खाल्ले. यावरून आशिष लोमटे याने दि. १४ जुलै रोजी सकाळी साडेदहा वाजता शेतातील आखाड्यावर अनिकेत लोमटे यांच्यासोबत वाद घातला. एवढेच नाही तर शिवीगाळ करत लाकडाने त्याला जबर मारहाण केली. यात अनिकेत लोमटे यांचा हात फ्रॅक्चर झाला आहे. अनिकेत लोमटे यांच्या तक्रारीवरून या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### अमेय भावसार याची मुंबई आयआयटीसाठी निवड

**नांदेड (प्रतिनिधी)–** भारतातील शिक्षण क्षेत्रात सर्वोच्च समजल्या जाणाऱ्या मुंबई आयआयटीमध्ये नांदेड येथील अमेय अभयकुमार भावसार



(दांडगे) हा पात्र ठरला आहे.

अमेय याची जिओ फिजिक्स या ब्रांचसाठी निवड झाली असून त्यास मुंबई आयआयटीमध्ये प्रवेश मिळाला आहे. विशेष म्हणजे आयआयटीच्या पहिल्याच राऊंडमध्ये त्याची मुंबई आयआयटीसाठी निवड झाली. अमेय भावसार हा नागार्जुना पब्लिक स्कूलचा विद्यार्थी आहे. तर अमेयचे महाविद्यालयीन शिक्षण तो नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालय झाले. या यशाबद्दल त्याचे सर्व स्तरातून कौतुक व अभिनंदन होत आहे. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे प्रदेश उपाध्यक्ष तथा दैनिक प्रजावाणीचे उपसंपादक अभयकुमार दांडगे यांचा तो मुलगा आहे.

# मागील सहा महिन्यांत रुग्णांना वैद्यकीय उपचारासाठी ३ कोटी ३१ लाख रुपयांचे अर्थसहाय्य वितरीत

## मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष गरजू रुग्णांसाठी ठरतोय वरदान

**नांदेड (प्रतिनिधी)–** मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष पात्र व गरजु रुग्णांसाठी वरदान ठरत आहे. १ जानेवारी ते ३० जून २०२५ या कालावधीत मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षातून नांदेड जिल्ह्यात ३८५ रुग्णांना ३ कोटी ३१ लाखांची मदत देण्यात आली. दिवसेंदिवस मदतीमध्ये वाढ होत आहे. गरजू रुग्णांना वेळेत मदत मिळावी, यासाठी आम्ही कटीबद्ध आहोत. संवेदनशील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनातून जिल्हा स्तरावर कक्ष उपलब्ध झाल्याने रुग्णांना मोठा दिलासा मिळत आहे, असे रामेश्वर नाईक, कक्ष प्रमुख, मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष यांनी सांगितले.



राज्यातील नागरिकांना दुर्धर आजारांवरील उपचारासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाकडून आर्थिक सहाय्य देण्यात येते. तसेच आपत्ती प्रसंगीही आर्थिक मदत देण्यात येते. यासाठी राज्यातील कानाकोपऱ्यातून मदत मिळविण्यासाठी नागरिक मंत्रालयात जात असत. परंतु नागरिकांना या सेवा सहजपणे त्यांच्या जिल्ह्याच्या ठिकाणी उपलबध व्हाव्यात, म्हणून आता प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी या कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. सध्या नांदेड येथे हा कक्ष जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील प्रशिक्षण भवनच्या इमारतीत कार्यरत आहे.

वैद्यकीय उपचाराकरिता मदत मिळण्यासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाशी संलग्नीत नांदेड जिल्ह्यातील खालील रुग्णालयांचा समावेश आहे. या निधीच्या मदतीतून रुग्ण या रुग्णालयात उपचार करुन घेतात. २१ सेन्चुरी हॉस्पिटल नांदेड, अभ्युदय लाईफ केअर सुपर स्पेशालिटी इन्स्टिट्यूट प्रा. ली. नांदेड, आनंद कॅन्सर आणि मल्टीस्पेशालिटी हॉस्पीटल नांदेड, अंकुर मॅक्स क्रीटीकल केअर नांदेड, अपेक्षा क्रिटीकल केअर सेंटर आणि मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल प्रा. ली. नांदेड, अश्विनी क्रिटीकल आणि हार्डकेअर सेंटर प्रा. ली. नांदेड, अथर्व सर्जिकल हॉस्पिटल, नांदेड, भगवती मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल नांदेड, गोदावरी इन्स्टिट्यूट ऑफ क्रिटीकल केअर मेडीसीन नांदेड, गव्हर्मेंट मेडीकल कॉलेज आणि हॉस्पिटल नांदेड, गुरुकृपा सुपर स्पेशालिटी हॉस्पीटल डॉक्टर लेन नांदेड, लव्हेकर हॉस्पीटल नांदेड, लोटस हॉस्पिटल नांदेड, मोनार्क कॅन्सर हॉस्पिटल नांदेड, मुंडे हॉस्पिटल देगलूर, जि. नांदेड, नांदेड क्रिटीकल केअर हॉस्पिटल आणि रिसर्च सेंटर नांदेड, नारायणा इन्स्टिट्यूट ऑफ मेडीकल सुपर स्पेशालिटी नांदेड, निर्मल न्युरो केअर अॅण्ड सुपर स्पेशालीटी सेंटर नांदेड, रेंगे हॉस्पिटल नांदेड, साई हॉस्पिटल सर्जीकल अॅण्ड क्सीडेंट नांदेड, संजीवन हॉस्पिटल नांदेड, श्री गंगा हॉस्पिटल नांदेड, श्रीनिवास ऑर्थोपेडीक नर्सिंग होम नांदेड, एसएसपी केअर अॅडव्हॉस पॅट्रीओट्रीक सेंटर प्रा. ली. नांदेड, सनराईज ग्लोबल सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल नांदेड, विश्व प्रयाग हॉस्पिटल नांदेड, यशश्री मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल नांदेड, यशोसाई क्रिटीकल केअर कौठा, नांदेड, यशोसाई हॉस्पिटल नांदेड, यशोसाई ऑर्थोपेडिक हॉस्पिटल कौठा, नांदेड या रुग्णालयाचा समावेश आहे. तरी गरजू व पात्र रुग्णांनी या उपक्रमांचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात येत आहे.

# सिडकोतील मुख्य रस्त्याला जंगलाचे स्वरूप

## वळण रस्त्यावर अपघाताची भीती वाढली



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** सिडको मुख्य मार्गाचे काही वर्षापूर्वी सिमेंट कॉंक्रीटीकरण करण्यात आले. परंतु वाहनांची वर्दळ असलेल्या या मार्गालगत साईड पट्टे टाकण्यात आले नसल्याने याठिकाणी मोठ्या प्रमाणात झाडे-झुडपे वाढले असून जंगलाचे स्वरूप आले आहे. यामुळे याठिकाणी अपघात होण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे.

जुना मोंढा नवीन पूल ते सिडको मार्गाचे सिमेंट कॉंक्रिटीकरण करण्यात आले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक लातूर ते सिडको मार्गावरील वसंतराव नाईक महाविद्यालयासमोरील मार्ग हा वळणाचा असून अरुंद रस्त्यावरून जड वाहनांसह इतर वाहने मोठ्या प्रमाणात धावत असतात. तर विरोधी दिशेला मोठी दुकाने व वसाहत आहे. दरम्यान ज्या ठिकाणी झाडे झुडपे वाढून जंगल निर्माण झाले त्याच ठिकाणी मोठी नाली असल्याने अपघात घडल्यास मोठा अनर्थ होऊ शकतो, यासाठी संबंधित विभागाने तात्काळ याचा बंदोबस्त करावा अशी मागणी नागरिकांतून केली जात आहे.

## ग्रामीण गुंठेवारी प्रस्ताव उपविभागीय अधिकारी कार्यालयात दाखल करावेत

**नांदेड (प्रतिनिधी)–** गुंठेवारीचे प्रस्ताव दाखल करण्यासाठी उपविभागीय अधिकारी कार्यालय, नांदेड (चिखलवाडी कॉर्नर नांदेड) येथे गुंठेवारी कक्ष स्थापन करण्यात आला आहे. नांदेड व अर्धापूर तालुक्यातील ग्रामीण भागातील गुंठेवारीचे प्रस्ताव दाखल करण्यास ३१ डिसेंबर २०२५ पर्यत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. त्यामुळे नागरिकांनी उपविभागीय अधिकारी कार्यालय, नांदेड येथे गुंठेवारीचे प्रस्ताव दाखल करावेत, असे प्राधिकृत अधिकारी (गुंठेवारी कक्ष) तथा उपविभागीय अधिकारी नांदेड यांनी कळविले आहे.

जिल्हाधिकारी नांदेड यांचे आदेशान्वये महाराष्ट्र गुंठेवारी विकास अधिनियम (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) अधिनियम २०२१ अंतर्गत महाराष्ट्र शासनाने ३१ डिसेंबर २०२० पूर्वीचे अनधिकृत भुखंड / अनधिकृत भुखंडावरील बांधकाम नियमाधिन करण्यास मान्यता दिली. त्यानुसार नांदेड जिल्ह्यातील महानगरपालिका, नगरपालिका व नगरपंचायत हद्दीअंतर्गत क्षेत्रवगळून उर्वरित ग्रामीण भागातील ३१ डिसेंबर २०२० पूर्वी अस्तित्वात असलेले अनधिकृत भुखंड / अनधिकृत भुखंडावरील बांधकाम नियमाधिन करण्यासाठी नगररचना विभाग (शाखा कार्यालय नांदेड) यांच्याकडे नोंदणीकृत परवानाधारक आर्किटेक्ट / इंजिनियर यांच्यामार्फत छाननी शुल्कासह प्रस्ताव दाखल करुन घेवून नांदेड व अर्धापूर तालुक्यातील ग्रामीण भागातील गुंठेवारीची सनद निर्गमित करण्यासाठी उपविभागीय अधिकारी नांदेड यांना प्राधिकृत करण्यात आलेले आहे, असे प्रसिद्धी पत्रकाद्वारे प्राधिकृत अधिकारी (गुंठेवारी कक्ष) तथा उपविभागीय अधिकारी नांदेड यांनी कळविले आहे.

## 'एक पेड माँ के नाम' मोहिमेअंतर्गत नरसी येथील ज्योती प्राथमिक शाळेत वृक्षारोपण




**नरसीफाटा (प्रतिनिधी)–** आईच्या निःस्वार्थ प्रेमाचा सन्मान करण्यासाठी आणि पृथ्वीला हिरवळीने भरण्यासाठी, नरसी येथील ज्योती प्राथमिक शाळेत 'एक पेड माँ के नाम' मोहिमेअंतर्गत विद्यार्थ्यांना झाडे वाटप करत वृक्षारोपण करण्यात आले.

चला झाडे लावू या. कृतज्ञता वाढवूया. प्रत्येक झाड आईच्या प्रेमाची, जीवनाच्या देणगीची कहानी सांगते हा बहुमूल्य संदेश देत येथील ज्योती प्राथमिक शाळेतील शिक्षकांनी आई व निसर्ग या दोन्ही दैवताच आपण देण लागतो. या उद्देशाने 'एक पेड माँ के नाम' वृक्षारोपणाचा कार्यक्रम घेऊन हस्ते वृक्षारोपण करण्यात आले व शाळेतील सर्वच विद्यार्थ्यांना विविध जातीच्या झाडाचे रोपटे वाटप करण्यात आले.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून केंद्रप्रमुख दगडगावे होते. कार्यक्रमाचे आयोजन मुख्याध्यापक सय्यद यांनी केले. यामध्ये शाळेचे शिक्षक इंगोले, कल्याणकर, चिखले, कदम, मुंडकर, श्याम, अफरोज, जावेद, चव्हाण यांनी परिश्रम घेतले.

## मौजे ब्रम्हपुरी गोदावरी नदीच्या पात्र परिसरात प्रतिबंधात्मक आदेश

**नांदेड (प्रतिनिधी)–** मौजे ब्रम्हपुरी येथील गोदावरी नदी पात्र परिसरात शांतता व सुव्यवस्था अबाधीत रहावी यासाठी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ नुसार नांदेड ग्रामीण पोलीस स्टेशनच्या हद्दीतील नदी पात्रातील परिसर प्रतिबंधीत क्षेत्र म्हणून २० जुलैचे ६ वाजेपासून ते १९ ऑगस्ट २०२५ चे मध्यरात्री पर्यंत घोषित करण्यात आले आहे. त्याबाबत जिल्हादंडाधिकारी कार्यालयाने आदेश निर्गमित केले आहेत.

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ नुसार प्राप्त अधिकाराचा वापर करुन वादग्रस्त जागा, ज्याची चतु:सिमा पूर्वेस वाजेगाव कोल्हापुरी बंधारा, पश्चिमेस नांदेड ते देगलूरकडे जाणाऱ्या रोडवरील जुना पूल, दक्षिणेस गोदावरीचे नदीचे पात्र आणि उत्तरेस चिल्ला/दर्गाची संरक्षण भिंत यामधील जागा २० जुलै २०२५ रोजी सकाळी ६ वाजेपासून ते १९ ऑगस्ट २०२५ रोजीच्या मध्यरात्री पर्यंत फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ प्रमाणे प्रतिबंधीत क्षेत्र म्हणून जिल्हादंडाधिकारी यांनी घोषित केले आहे.

## गावाच्या स्वच्छतेचा मान तुमच्या प्रतिसादावर 'एसबीएमएसएसजी' २०२५ अॅपद्वारे सहभाग नोंदवा -सीईओ मेघना कावली

**नांदेड (प्रतिनिधी)–** स्वच्छ भारत अभियान ग्रामीण २०२५ अंतर्गत सुरू असलेल्या देशव्यापी सर्वेक्षणात नांदेड जिल्ह्याचा सहभाग वाढवण्यासाठी नागरिकांना पुन्हा एकदा सक्रिय होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. गावपातळीवरील स्वच्छतेचे मूल्यमापन हे नागरिकांच्या थेट अभिप्रायावर आधारित असून, एसबीएमएसएसजी २०२५ हे अधिकृत अॅप त्यासाठी केंद्र सरकारने उपलब्ध करून दिले आहे. नागरिकांनी यापमध्ये आपल्या प्रतिक्रिया नोंदवाव्यात, असे आवाहन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक मेघना कावली यांनी केले आहे.

**१००० गुणांवर मूल्यांकन करण्यात येणार**

स्वच्छ सर्वेक्षण ग्रामीणसाठी स्वच्छते थेट १००० गुणांच्या आधारे मुल्यांकन करण्यात येणार आहे. यामध्ये घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन १२० गुण, नागरिकांचा सहभाग व मानसिकता १०० गुण, स्वच्छता सुविधांचा वापर २४० गुण तर प्रत्यक्ष पाहणी व सर्वेक्षण प्रश्नावली ५४० गुण आहेत.

या अॅपद्वारे नागरिकांना त्यांच्या गावातील शौचालय वापर, सांडपाणी आणि घनकचरा व्यवस्थापनासंबंधी फक्त १३ सोप्या प्रश्नांची उत्तरे द्यायची आहेत. हे सर्वेक्षण केवळ दोन मिनिटांचा असून, प्रत्येक नागरिकांचा सहभाग गावाच्या रेटिंगवर प्रभाव टाकतो. यासाठी गट विकास अधिकारी, जिल्हयातील सर्वर प्राचार्य, आरोग्य अधिकारी, गटशिक्षणाधिकारी, बाल विकास प्रकल्प अधिकारी व जिल्हा परिषद विभागप्रमुख यांनी समन्वय साधून अधिकाधिक नागरिकांपर्यंत पोहोचण्याचे नियोजन करावे, असे निर्देश मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांनी दिले आहेत.

**अॅपवर वापरण्याची प्रक्रिया:** एसबीएमएसएसजी २०२५ अॅप गुगल प्ले स्टोअरवरून डाऊनलोड करावे. त्यानंतर मोबाइल क्रमांक टाकून ओटीपीद्वारे लॉगिन करा. भाषा निवडा, राज्य, जिल्हा, गाव भरून सर्वेक्षण सुरू करा. त्यानंतर १३ प्रश्नांची उत्तरे देऊन सहभाग नोंदवा. या प्रक्रियेसाठी ठ कोडही उपलब्ध असून, स्कॅन करून थेट डाऊनलोड करता येते. जिल्ह्यातील सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, विविध समिती, महिला बचत गट, युवक, शिक्षक, उद्योजक आणि स्वयंसेवी संस्था यांनी या अभियानात भाग घेऊन गावासाठी अभिमानाची कामगिरी बजावावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

## एमपीएससी परीक्षेत यशाबद्दल कुसूमताई विद्यालयात वैभव पईतवार यांचा सत्कार

### अपंगत्वावर मात करीत मिळविले यश

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** कुसुमताई माध्यमिक विद्यालय सिडको येथील विद्यार्थी वैभव शिवकुमार पईतवार यांनी२०२४-२५ मध्ये घेण्यात आलेल्या महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत उत्तीर्ण होऊन अपंगत्वावर मात करीत यश मिळविले आहे.

वैभव पईतवार यांनी एमपीएसी परीक्षेत यश मिळविल्याबद्दल त्यांचे कुसूमताई विद्यालयाच्या शाळेच्या प्राचार्या सौ. शशिकला जाधव- बिरादार यांनी सत्काराचे आयोजन केले होते. यावेळी संस्थेचे सचिव संभाजीराव बिरादार यांच्या हस्ते विद्यालयाच्या प्रांगणात वैभव पईतवार यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी प्राचार्या शशिकला बिरादार, पर्यवेक्षक शेख निजाम गवंडगावकर, सौ. उज्वला सावते, सांस्कृतिक प्रमुख विश्वास हंबर्डे, वंदना सोनाळे यांच्यासह सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.



विशेष बाब म्हणजे वैभव पईतवार यांना विजेचा शॉक लागल्यामुळे त्यांचे दोन्ही हात निकामी झाले होते. कधी हाताने तर कधी पायाने अक्षरे गिरवीत त्यांनी हे यश मिळविले आहे आणि महसूल सहायक पदावर पोहचले. वैभव पईतवार येथेच न थांबता क्लास वन अधिकारी होण्याचे स्वप्न त्यांनी यावेळी बोलवून दाखविले.

वैभव यांचे वडिल ऑटो रिक्षाचालक, आई गृहिणी असून दारिद्र्याची भणभण अन् पैशाची चणचण घेऊन वैभव दिवसागणिक अधिकारी होण्याचे स्वप्न पाहत होते. त्यांच्या कठोर परिश्रमाला यश आले आहे.

## रिडींग जास्त येत असल्याने स्मार्ट मीटर काढून जुने मीटर बसवण्याची मागणी



**कुंडलवाडी (प्रतिनिधी)–** कुंडलवाडी शहरात महावितरणकडून जुने मीटर काढून स्मार्ट मीटर बसवण्याचे काम आहे. बसवलेले स्मार्ट मिटरची रिडींग जास्त येत असल्याने स्मार्ट मीटर काढून घ्यावे व त्याजागी जुनेच मीटर बसवावे अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.

कुंडलवाडी शहरात गेल्या तीन चार महिन्यांपासून स्मार्ट मिटर बसवणे चालू आहे. स्मार्ट मिटरचे बिल चार ते पाच पटीने जास्तीचे येत आहे. सामान्य नागरिकांना या स्मार्ट मिटरचा बिलाचा भुर्दंड सहन करावा लागत आहे. त्याकरिता सदरली स्मार्ट मीटर काढून जुनेच मीटर बसून द्यावे, अन्यथा कुंडलवाडीच्या डॉ. हेडगेवार चौकात हे स्मार्ट मीटर जाळून निषेध केला जाईल, असा इशारा देण्यात आला. अशा आशयाचे निवेदन माजी नगरसेवक शेख मुखत्यार, खाजामिया यांच्यासह अन्य नागरिकांनी महावितरणच्या कनिष्ठ अभियंता यांच्याकडे दिले आहे.

# नांदेड परिमंडळात वीज चोरांविरूद्ध धडक मोहीम सुरु

**नांदेड (प्रतिनिधी)–** परिमंडळातील नांदेड, परभणी आणि हिंगोली जिल्ह्यांत शहरी व ग्रामीण भागात महावितरणने ११५० वीज चोरांविरूद्ध कारवाया केल्या आहेत. शिवाय, जुलै २०२५ या महिन्यातही सर्वत्र वीज चोरांविरुध्दची मोहीम तीव्र केलेली आहे. विद्युत ग्राहकांनीही विजेचा अधिकृतपणेच वापर करुन नियमितपणे वीज बिलांचा भरणा करावा. वीज चोरी प्रकरणी होणारी कटू कारवाई टाळून अखंडित वीज पुरवठ्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन मुख्य अभियंता राजाराम माने यांनी केले आहे.




चालू आर्थिक वर्षातील मागील तीन महिन्यांत भारतीय विद्युत कायदा २००३ च्या कलम १२६ व १३५ नुसार नांदेड जिल्हयात ७२१, परभणीत २४६ तर हिंगोली जिल्हयात १८३ जणांवर वीज वाहिन्यांवर आकोडे टाकणे, मीटरमध्ये हेराफेरी व इतर अवैध मार्गाने वीज वापर करुन ३ कोटी ५ लाख रुपयांची वीज चोरी केली. त्या प्रकरणी त्यांच्यावर कारवाई करण्यात आलेली आहे.

वाढत्या वीज चोऱ्यामुळे अखंडित व सुरळीत वीज पुरवठयामध्ये अडथळे निर्माण होत असून महावितरणचा कोट्यवधी रुपयांचा महसूलही बुडत आहे. त्यामुळे जूलै-२०२५ मध्ये तीनही जिल्ह्यांत अनधिकृत वीज वापराविरूद्ध मोहीम तीव्र करण्यात आली आहे.

या कारवाई दरम्यान महावितरणच्या कामात कुठे अडथळे निर्माण होत असल्यास अडथळे निर्माण करणाऱ्यांविरुध्द सरकारी कामात अडथळा प्रकरणी पोलिसांत गुन्हे दाखल करण्याच्या सुचनाही वरिष्ठ कार्यालयाकडून नांदेड महावितरणला देण्यात आलेल्या आहेत.

## ग्रामीण व उपजिल्हा रुग्णालयांत डायलिसिस सुविधा त्वरित उपलब्ध करा -खा.रवींद्र चव्हाण

**नांदेड (प्रतिनिधी)–** ग्रामीण भागातील किडनीच्या आजाराने त्रस्त असलेल्या रुग्णांना डायलिसिससाठी शहरात यावे लागत असल्यामुळे त्यांना वेळेवर उपचार मिळणे कठीण जात आहे. शिवाय आर्थिक अडचणींचाही सामना करावा लागत आहे. तालुकास्तरावरील उपजिल्हा रुग्णालये तसेच ग्रामीण रुग्णालयांमध्ये डायलिसिस सुविधा उपलब्ध करून रुग्णांची होणारी हेळसांड थांबवावी, अशी मागणी खासदार रवींद्र वसंतराव चव्हाण यांनी जिल्हा शल्यचिकित्सकांकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.



आपल्या निवेदनात खा.रवींद्र चव्हाण यांनी नमुद केले की, नांदेड जिल्ह्यातील ग्रामीण भागामध्ये किडनी विकार असलेल्या रुग्णांची संख्या खुप मोठी आहे. तसेच अशा रुग्णांमध्ये दिवसेंदिवस भर पडत आहे. या आजारांवर उपचार करण्यासाठी वेळोवेळी त्यांना शहरात यावे लागत आहे. खाजगी रुग्णालयात डायलिसिस सुविधा घेण्यासाठी लागणारा खर्च त्यांना परवडणारा नाही.

डायलिसिस यंत्रणा ग्रामीण रुग्णालये तसेच उपजिल्हा रुग्णालयांमध्ये असणे गरजेचे असून प्रत्येक तालुक्यातील रुग्णालयांमध्ये ही सुविधा तात्काळ उपलब्ध करून द्यावी, जेणे करून अशा रुग्णांना वेळेत उपचार मिळू शकेल. शिवाय त्यांचे जीवनमान सुधारेल. या निवेदनाची तात्काळ दखल घेऊन डायलिसिस सुविधा ग्रामीण रुग्णालये व उपजिल्हा रुग्णालयांमध्ये त्वरित उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी खा.रवींद्र चव्हाण यांनी केली.

# चंदेरी

## शूटिंग करताना शाहरुख खान जखमी




**बॉलिवूड सुपरस्टार शाहरुख खानला दुखापत झाल्याचे वृत्त आहे. किंग चित्रपटाचे शूटिंग सुरू असताना एका ॲक्शन सीनच्या शूटिंग दरम्यान शाहरुखला दुखापत झाली असून, यामुळे त्याने शूटिंगमधून ब्रेक घेतला आहे. डॉक्टरांनी त्याला एक महिना विश्रांतीचा सल्ला दिला आहे.**

मुंबईतील एका फिल्म स्टुडिओमध्ये एका ॲक्शन सीनचे शूटिंग सुरू होते. किंग चित्रपटात शाहरुख त्याची मुलगी सुहाना खानसोबत दिसणार आहे. असे म्हटले जाते की शूटिंगदरम्यान त्याच्या स्नायूंना दुखापत झाली. असेही सांगितले गेले, की दुखापत फारशी गंभीर नाही. दुखापतीमुळे शाहरुख त्याच्या टीमसह आवश्यक उपचारांसाठी अमेरिकेला गेला आहे. यामुळे किंग चित्रपटाचे शूटिंग सध्यासाठी थांबले आहे. जुलै ते ऑगस्ट दरम्यानचे शूटिंग शेड्यूल पुढे ढकलण्यात आले आहे. आता पुढील शेड्यूल सप्टेंबर किंवा ऑक्टोबरमध्ये सुरू होईल. या वर्षाच्या सुरुवातीला जयपूरमधील एका कार्यक्रमादरम्यान शाहरुख कॉलरखाली काळी टेप लावताना दिसला होता. तेव्हाही असा अंदाज होता की तो किंग या ॲक्शन थ्रिलर चित्रपटाच्या शूटिंग दरम्यान जखमी झाला असावा. जवान आणि पठाण चित्रपटाच्या ब्लॉकबस्टर यशानंतर किंग हा चित्रपट शाहरुख खानच्या सर्वात महत्त्वाकांक्षी चित्रपटांपैकी एक आहे. पठाण आणि वॉर चित्रपटांचे दिग्दर्शन करणारे सिद्धार्थ आनंद हे त्याचे दिग्दर्शन करत आहेत. चित्रपटात शाहरुख खानची मुलगी सुहानादेखील तिच्या वडिलांसोबत दिसणार आहे. सुहानाने द आर्चीज चित्रपटाद्वारे डिजिटल पदार्पण केले. अशा परिस्थितीत, किंग हा चित्रपट थिएटरमध्ये प्रदर्शित होणारा तिचा पहिला चित्रपट असेल. अलिकडेच अशी चर्चा आहे की या चित्रपटात दीपिका पदुकोण, राणी मुखर्जी, अभिषेक बच्चन, जयदीप अहलावत, अनिल कपूर, अर्शद वारसी आणि जॅकी श्रॉफदेखील आहेत.

**१ महिना विश्रांती घेण्याचा डॉक्टरांचा सल्ला**

### विशेष मुलाखत : अनुपम खेर

# जगात पसरवायचाय फक्त चांगुलपणा !



**पत्नी किरण खेरसोबतच्या प्रेमबंधनाचे रहस्य सांगितले**

**अभिनेता म्हणून बॉलीवूडपासून हॉलिवूडपर्यंत सर्वांना प्रभावित करणारे अनुपम खेर २३ वर्षांनी तन्वी: द ग्रेट या त्यांच्या नवीन चित्रपटाद्वारे दिग्दर्शनात परतले आहेत. या चित्रपटात एका ऑटिस्टिक मुलीची धाडसी कहाणी सांगणारे अनुपम खेर म्हणतात की आता त्यांच्या आयुष्याचा एकमेव उद्देश जगात चांगुलपणा पसरवणे आहे. त्यांची विशेष मुलाखत...**

**प्रश्न : दिग्दर्शक म्हणून तुमचा पहिला चित्रपट ओम जय जगदीश २००२ मध्ये प्रदर्शित झाला. २३ वर्षांनंतर तुम्ही दिग्दर्शनात परतण्याचा निर्णय कसा घेतला ?**

» **अनुपम खेर :** मी २३ वर्षांनंतर दिग्दर्शन करत आहे याचे लोकांना आश्चर्य का वाटते? जर कोणी म्हणत असेल की मी २३ वर्षांनंतर अभिनय करत आहे, तर ते आश्चर्यकारक आहे. दिग्दर्शक म्हणून मला यापूर्वी कधीही अशी पटकथा मिळाली नाही. मला तन्वीः द ग्रेट ची कथा ४ वर्षांपूर्वी मिळाली होती, जी मला सांगायची होती. ही धाडस, चांगुलपणा आणि स्वाभिमान या गोष्टींची कहाणी आहे ज्यावर माझा विश्वास वाढत आहे. मी मानतो की एक माणूस म्हणून चांगुलपणा पसरवणे आणि उदार असणे खूप महत्वाचे आहे, म्हणून चार वर्षांपूर्वी जेव्हा मी माझ्या भाची (बहिणीची मुलगी) तन्वीला भेटलो, जी ऑटिस्टिक आहे, तेव्हा मला या कथेची कल्पना तिथूनच सुचली. आम्ही माझ्या भावाची मुलगी वृंदाच्या लग्नासाठी गुडगावमधील एका फार्म हाऊसवर जमलो होतो. तिथे सर्वजण आनंद घेत होते. तन्वी एका कोपऱ्यात एकटी उभी राहून डोंगराकडे पाहत होती, म्हणून मी तिला विचारले की तू काय पाहत आहेस? तर ती म्हणाली की मी माझ्या जगाकडे पाहत आहे. आता ही इतकी मोठी गोष्ट होती की मला वाटले की मी एका ऑटिस्टिक मुलीची कहाणी सांगावी जी चांगुलपणाची शक्ती सांगून आपल्यासारख्या सामान्य लोकांचे जग बदलू शकते.

**प्रश्न : ही चांगली गोष्ट तुमच्या अनेक इंस्टाग्राम व्हिडिओंमध्येही दिसते. त्यामागील विचार काय आहे ?**

» **अनुपम खेर :** मी एका लहान शहरातून आहे. आम्ही संयुक्त कुटुंबात राहत होतो. आम्ही गरीब होतो पण आनंदी होतो. आमच्या पालकांनी आम्हाला कधीही असे वाटू दिले नाही की आम्ही गरीब आहोत. माझे वडील म्हणायचे की जगात सर्वात सोपी गोष्ट म्हणजे एखाद्याला आनंदी करणे, म्हणून जेव्हा १२-१३ वर्षांपूर्वी त्यांचे निधन झाले, तेव्हा मी त्यांच्या आत्म्याला आनंदी ठेवायचे असेल तर त्यांच्या शिकवणी माझ्या आयुष्यात अंमलात आणण्याचा निर्णय घेतला. मी हे आधीही करायचो, पण त्यांच्या मृत्यूनंतर मी ते अधिक करू लागलो. मी ते एक-दोन वर्षे केले आणि नंतर ते सवयीचे झाले. मला सर्वांना आनंदी करायला आवडते. मी रस्त्याने जाताना, कधीकधी मी गाडीत असताना, मुले फोटो काढण्यासाठी येतात. माझा सुरक्षा रक्षक म्हणतो, साहेब, दार उघडू नका, पण मी ते करू शकत नाही. मला वाटते की जर मी दार उघडले नाही तर त्यांना अपमान झाल्यासारखे वाटेल. जे मी करू इच्छित नाही.

**प्रश्न : तुमचा चित्रपट कान्स फिल्म फेस्टिव्हलमध्ये प्रदर्शित झाला होता. एक काळ असा होता की कान्समध्ये फक्त कलाकारांच्या कपड्यांची चर्चा होत असे, आता चित्रपटांची पुन्हा चर्चा होत आहे. आंतरराष्ट्रीय चित्रपट व्यासपीठावर बॉलीवूड चित्रपटांचा चा दर्जा वाढला आहे असे तुम्हाला वाटते का ?**

» **अनुपम खेर :** भारत आर्थिकदृष्ट्या, सांस्कृतिकदृष्ट्या एक उदयोन्मुख शक्ती आहे. सांस्कृतिकदृष्ट्या आपण नेहमीच खूप श्रीमंत आहोत, परंतु आपण १००० वर्षांपासून गुलाम असल्याने, आपल्यावर ८०० वर्षे मुघलांनी आणि २०० वर्षे ब्रिटिशांनी राज्य केले, त्यामुळे अनेक वर्षे आपल्यातून अपराधीपणाची भावना गेली नाही, पण आपण अद्भुत लोक आहोत. आपले खेळाडू, बुद्धिबळपटू, खेळाडू जगभरात खूप चांगले प्रदर्शन करत आहेत. म्हणूनच मी मानतो की आपण तन्वीः द ग्रेटच्या रूपात जगासाठी भारताची कहाणी तयार केली आहे.



**प्रश्न : कदाचित ही चांगुलपणाची ताकद आहे की ज्या चित्रपटसृष्टीत लोक एकमेकांना कमी लेखण्याबद्दल बोलतात, तिथे शाहरुख खानपासून ते अक्षय कुमारपर्यंत सर्वजण तुमच्या चित्रपटाचे कौतुक करत आहेत. तुम्ही हे मित्र मिळवले आहेत!**

» **अनुपम खेर :** नक्कीच, मी खूप खरे मित्र मिळवले आहेत आणि यासाठी नातेसंबंधांमध्ये गुंतवणूक करावी लागते. मी खूप भाग्यवान आहे की मला माझ्या सर्व समकालीन आणि कनिष्ठांचा पाठिंबा मिळत आहे. शाहरुख एक अद्भुत व्यक्ती आहे. तो खूप उदार आहे. त्याला इतरांना देण्याची खूप आवड आहे. म्हणूनच देवाने त्याला खूप काही दिले आहे आणि तो ते आनंदाने करतो. त्याला लोकांना आनंदी करायला आवडते. आम्ही चाहत, दिलवाले दुल्हनिया ले जायेंगे, कुछ कुछ होता है असे अनेक चित्रपट एकत्र केले आहेत... आणि हे तेव्हापासून आहे जेव्हा मोबाईल नव्हते, तेव्हा नातेसंबंध तयार झाले होते. आम्ही ते नाते टिकवून ठेवले आहे. पण फक्त शाहरुख, अक्षय, अमिताभ बच्चन यांनीच ट्विट केले नाही. वरुण धवन, अभिषेक बच्चन, रितेश देशमुख, प्रभास, सर्वांनीच केले. मला अनिल कपूरच्या ट्विटची माहितीही नव्हती. मी त्याच्या घरी जेवत होतो. मी माझे ९० टक्के जेवण त्याच्या घरीच जेवतो, मी त्याच्या पत्नीला माझे नाव तुझ्या रेशन कार्डवर लिहिण्यास सांगितले (हसतो). तिथे अनिल म्हणाला, मित्रा, मी तुझ्या चित्रपटासाठी ट्विट केले होते, तू अजिबात प्रतिक्रिया दिली नाहीस, मग मी म्हटले की मी तो पाहिलाही नाही. यावरून जगात चांगुलपणा आहे हे दिसून येते.

**प्रश्न : तुमचा मेट्रो हा चित्रपट आजकाल चर्चेत आहे. त्यात एक संवाद आहे की एखाद्या व्यक्तीवर प्रेम करण्यासाठी, दररोज त्याच्या प्रेमात पडावे लागते. पत्नी किरण खेरसोबतच्या तुमच्या अतूट प्रेमाच्या बंधनाचे रहस्य काय आहे ?**

» **अनुपम खेर :** वेगळे राहणे. ती चंदीगडमध्ये राहते, मी मुंबईत राहतो, त्यामुळे खूप फरक पडतो (हसतात). नाही, विनोद वेगळा आहे, पण लग्नापूर्वीही आमची मैत्री खूप चांगली होती. लग्नात चढ-उतार येतात. मी माझ्या आई- वडिलांना भांडताना पाहिले आहे. मी माझ्या आईला रडताना पाहिले आहे, माझे वडील चिडचिडे व्हायचे, पण नात्यात दुसऱ्या व्यक्तीचा आदर करणे खूप महत्वाचे आहे, तुम्ही त्याचा अनादर करू नका. मी म्हणेन की हे एक खूप अद्भुत नाते आहे, तो दृष्टिकोन वेगळा असू शकतो, पण आयुष्याची ४० वर्षे एखाद्यासोबत घालवणे खूप आहे. त्यात कठीण काळ आले, पण चांगले काळही आले, पण जे नाते नेहमीच मजबूत राहिले ते म्हणजे आमची मैत्री, जी आमच्या लग्नापूर्वीही अस्तित्वात होती.

# संघर्षातून यशाकडे... तृप्तीचा उत्तराखंड ते मुंबई प्रवास

## अभिनयावरच माझे उत्कट प्रेम, ते साध्य करण्यासाठी ‘करा किंवा मरा’ची होती भूमिका !



**उत्तराखंड ते मुंबई हा प्रवास तृप्ती डिमरीसाठी सोपा नव्हता, पण आज ती तिच्या प्रगतीवर समाधानी आहे. लैला मजनू, बुलबुल, काला सारख्या चित्रपटांमध्ये काम केल्यानंतर आणि ॲनिमलमध्ये ग्लॅमर दाखवल्यानंतर, ती आता धडक २ मधील भूमिकेमुळे चर्चेत आहे. एका खास मुलाखतीत तिने करिअरमधील संघर्ष, सुरुवातीला मिळालेली भेदभावाची वागणूक आणि लव्ह लाइफबद्दल उघडपणे सांगितले...**



**प्रश्न : आज तू बॉलिवूडची मोठी नायिका झाली आहेस, तुझ्यासाठी भूमिका लिहिल्या जात आहेत, पण तुझ्या कारकिर्दीतील सर्वात कठीण काळ कोणता होता ?**

» **तृप्ती :** माझ्यासाठी सर्वात कठीण काळ होता जेव्हा मी दिल्लीहून मुंबईत येण्याचा निर्णय घेतला. बॉलीवूडमधील कार्यपद्धतीबद्दल मला काहीच कल्पना नव्हती. मी फक्त माझी बॅग उचलली आणि आले. माझ्याकडे खूप पैसे किंवा पर्याय नव्हते, की मला अभिनयाचेही ज्ञानही थोडेफारच होते. मी फक्त मला कुठे काय जमेल हेच शोधत होते. मी इथे कोणालाही ओळखतही नव्हते. पण मी स्वतःला खूप भाग्यवान मानते, की मला काही लोक भेटले ज्यांनी मला पाठिंबा दिला. त्यांनी मला योग्य मार्गदर्शन तर केलंच, पण संधीची दारेही खुली करून दिली. मी पहिल्यांदाच घरापासून दूर होते आणि मला घराची खूप आठवण येत असे. जेव्हा ऑडिशन्स नसत तेव्हा मला खूप एकटे वाटायचे. कधीकधी पन्नास ऑडिशन्स दिल्यानंतर, मी एका ऑडिशन्समध्ये निवडले जायचे आणि कधीकधी तेही होत नसे. सुरुवातीला मी वांद्रेला चार-पाच जणींनी मिळून शेअरिंगवर एक घर घेतलं होते, ज्यामध्ये आम्ही राहत होतो. तो खरोखरच खूप कठीण काळ होता.

**प्रश्न : सुरुवातीच्या कठीण काळात तुला सर्वात जास्त कोणी साथ दिली ?**

» **तृप्ती :** बऱ्याच वेळा असे व्हायचे की महिनोन्‌महिने काम किंवा ऑडिशन नव्हते, मग खूप निराशा व्हायची. बऱ्याच वेळा धाडस तुटायचे आणि मनही. अशा वेळी माझ्या बहिणीने मला खूप साथ दिली. ती मला सतत प्रोत्साहन द्यायची. ती म्हणायची, आता तू हा मार्ग निवडला आहेस, तू काहीतरी करायलाच हवे. एकदा मी ऑडिशनसाठी जात होते आणि कोणीतरी माझ्याबद्दल असे काही बोलले जे माझ्या मनाला भिडले. मग मी ठरवले की मी येथून रिकाम्या हाताने जाणार नाही. जर मी आले तर मी काहीतरी करेन. अडचणी आल्या. बऱ्याच वेळा मला माझ्या पालकांना खोटे बोलावे लागले की सर्व काही ठीक आहे. ते विचारायचे, तू जेवलीस का? मग मला म्हणावे लागले, हो, मी चांगले खाल्ले, नाहीतर ते टेन्शनमध्ये येऊन मला घरी परत बोलावायचे. आणखी एक गोष्ट, आम्ही भाग्यवान होतो की आमच्याकडे घरी परतण्याचा पर्याय होता, परंतु बऱ्याचदा लोकांकडे तो पर्याय नसतो. मला अनेकदा वाटते, मला संधी मिळाली, मला चांगले लोक आणि आधार देणारे पालक मिळाले, परंतु बऱ्याच लोकांकडे हे काहीही नसते. माझे आईवडील नेहमी म्हणायचे की या क्षेत्रात काहीही घडत नाही, म्हणून घर हे निश्चितच एक सुरक्षित ठिकाण आहे जिथे मी परत येऊ शकते. परंतु अनेकांना ती सुरक्षितता नसते.

**प्रश्न : तुझा नवा चित्रपट धडक २ केवळ प्रेमाच्या उत्कटतेवरच नाही तर जातीभेदाच्या मुद्द्यावरही प्रकाश टाकतो. तुला प्रत्यक्ष जीवनात भेदभाव कधी जाणवला का ?**

» **तृप्ती :** एक मुलगी म्हणून मला खूप भेदभाव जाणवला. मी थोडी मोठी झाल्यावर मला कळले की जेव्हा मी जन्माला आले तेव्हा लोक आनंदी नव्हते. त्यांचा दृष्टिकोन असा होता की, अरे मुलगी झाली आहे (ते हसून म्हणायचे). बऱ्याचदा आपण आपल्या नातेवाईकांकडून ऐकतो की जर कुटुंबात दोन-तीन मुली जन्माला आल्या तर पुढच्या मुलासाठी खूप दबाव असतो. मुलगा असणे महत्त्वाचे आहे, नाहीतर वंश कसा पुढे जाईल? आजच्या काळातही, जेव्हा शिक्षित असूनही लोक असा विचार करतात तेव्हा आश्चर्य वाटते. मी माझ्या आजूबाजूला उच्च-नीच आणि श्रीमंत-गरीब असा भेदभाव पाहिला आहे. लोक त्यांच्या घरातील नोकराशी कसे वागतात हे मी पाहिले आहे. या सर्व गोष्टी तुमच्या नियंत्रणात नाहीत, पण कधीकधी त्या वाचल्यानंतर आणि पाहिल्यानंतर तुम्हाला प्रश्न पडतो की या गोष्टी कधी संपतील?

**प्रश्न : आजच्या युगात प्रेमात पॉकेटिंग, सिंपिंग, ब्रेडक्रबिंग, घोस्टिंग असे शब्द आले आहेत. अशा परिस्थितीत तुझ्यासाठी प्रेम म्हणजे काय ?**

» **तृप्ती :** मी हे आधी सांगितले आहे की माझ्यासाठी प्रेम म्हणजे मैत्री. एकमेकांना समजून घेणे, सर्वात महत्त्वाचे म्हणजे, भावना समजून घेणे, कारण आपण माणसे आहोत. असे अनेक प्रसंग येतात जेव्हा आपला दिवस चांगला जात नाही, कामाचा ताण असतो. जर एखादी व्यक्ती तुमचा मूड समजू शकते, तुमच्या गरजा समजून घेऊ शकते आणि कोणत्याही अपेक्षेविना तो तुम्हाला जीव लावेल, त्याला मी प्रेम म्हणेल. थोडीशी समस्या किंवा भांडण झाले तर तो त्याच्या मार्गाने जात असेल तर प्रेम नाही. आजकाल, आपण या गोष्टी खूप पाहतो. आपण आपल्या पालकांना पाहत मोठे झालो आहोत. आपण त्यांचे भांडणे, त्यांचा राग पाहिला आहे आणि हेदेखील पाहिले आहे की ते सकाळी भांडतात आणि संध्याकाळी एकत्र चहा पितात. माझ्यासाठी प्रेम म्हणजे जिथे भांडणे आणि भांडणे असतात, पण त्याच वेळी एकमेकांबद्दल खोलवरचा समजूतदारपणा असतो. सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे आदर. कारण जिथे आदर नसतो तिथे काहीही नसते.

**प्रश्न : तू कधी अशा उत्कट प्रेमात पडली आहेस का ज्याचा परिणाम मृत्यूपर्यंत होऊ शकतो ?**

» **तृप्ती :** मी आतापर्यंत कोणत्याही व्यक्तीवर प्रेम केलेले नाही. असे आवश्यक नाही की उत्कटता फक्त त्या व्यक्तीसाठीच असेल. प्रेमाचे अनेक प्रकार असू शकतात, पालकांसाठी, एखाद्याच्या कामासाठी, पोटासाठी, एखाद्याच्या कोणत्याही गोष्टीसाठी. मला अभिनयाबद्दल असे उत्कट प्रेम वाटले आहे. माझ्या आयुष्यात एक क्षण असा आला जेव्हा मी करा किंवा मरा अशा परिस्थितीत होते. हे त्यावेळी घडले जेव्हा मी दिल्लीत होते. मला अभिनय सोडून घरी परत येण्यास सांगण्यात आले. त्या क्षणी मी मुंबईत आले. आज मी म्हणू शकते की ज्या उत्कटतेने मी मुंबईत आले होते, ती पूर्ण झाली आहे. माझे प्रेम मला मिळाले. आज मी अभिनय करत आहे.

# राज्यातील ३५७ पशुवैद्यकीय दवाखान्यांना मिळणार नवीन इमारती –मंत्री पंकजा मुंडे

**मुंबई (प्रतिनिधी)** राज्याच्या पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांच्या दूरदृष्टीमुळे राज्यातील ३५७ पशुवैद्यकीय दवाखान्यांना लवकरच नवीन इमारती मिळणार आहेत. जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत या प्रकल्पासाठी ४५८ कोटी ४१ लाख ३४ हजार रुपयांची भरीव तरतूद करण्यात आली आहे. यात नवीन इमारतींचे बांधकाम, दुरुस्ती, स्वच्छतागृहे आणि उपकरणे खरेदीचा समावेश आहे.

पंकजा मुंडे यांनी पर्यावरण आणि पशुसंवर्धन विभागाची सूत्रे हाती घेतल्यापासून अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. पशुसंवर्धनाला कृषी व्यवसायाचा दर्जा देणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य बनवण्याचा निर्णय घेतल्यानंतर, आता पशुवैद्यकीय दवाखान्यांच्या आधुनिकीकरणावर भर देण्यात येत आहे.

या निर्णयामुळे राज्यातील सात महसुली विभागांतील ३४ जिल्ह्यांमधील एकूण ३५७ ठिकाणी पशुवैद्यकीय दवाखान्यांना नवसंजीवनी मिळणार आहे. नवीन इमारतींच्या बांधकामासाठी २८७ कोटी ७६ लाख ४४ हजार, दुरुस्तीसाठी १२१ कोटी ११ लाख ८२ हजार, स्वच्छतागृहांसाठी २५ कोटी १७ लाख २० हजार, आणि विविध उपकरणे खरेदीसाठी २४ कोटी ३५ लाख ८८ हजार रुपये असा एकूण ४५८ कोटी ४१ लाख ३४ हजार रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला जाईल. ही सर्व कामे सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत प्रस्तावित करण्यात येतील.

**जिल्ह्यानिहाय तरतूद**

बीड जिल्ह्यासाठी २४ इमारतींच्या बांधकामासाठी ९ कोटी ४० लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. विभागनिहाय नवीन इमारतींची संख्या खालीलप्रमाणे आहे: मुंबई विभाग (ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग): १३ ठिकाणी

पुणे विभाग (पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर): १२५ ठिकाणी

नाशिक विभाग (नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव, अहमदनगर): ५५ ठिकाणी

छत्रपती संभाजीनगर विभाग (छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, बीड): ५१ ठिकाणी

लातूर विभाग (लातूर, नांदेड, धाराशिव, हिंगोली): ३९ ठिकाणी

अमरावती विभाग (अमरावती, अकोला, बुलढाणा, वाशीम, यवतमाळ): ३८ ठिकाणी

नागपूर विभाग (नागपूर, भंडारा, वर्धा, चंद्रपूर, गोंदिया, गडचिरोली): ३६ ठिकाणी

या दूरगामी निर्णयामुळे राज्यातील पशुधनाच्या आरोग्याची अधिक चांगल्या प्रकारे काळजी घेतली जाईल आणि पशुपालकांनाही अत्याधुनिक सुविधा उपलब्ध होतील, अशी अपेक्षा आहे.

# विमानतळावर १.४५ कोटीचे ड्रग्ज घेऊन जाणाऱ्या तस्कराला अटक

**मुंबई (प्रतिनिधी)** मुंबई कस्टम अधिकाऱ्यांनी मुंबई विमानतळावर एका प्रवाशाच्या ट्रॉली बॅगमधून १,४५२ ग्रॅम गांजा जप्त केला आहे . मुंबई कस्टम अधिकाऱ्यांनी बँकॉकहून ड्रग्ज तस्करीसाठी येणाऱ्या ह्या प्रवाशाला अटक केली आहे . आणि त्याच्याकडे असलेला सर्व मुद्देमाल जप्त केला आहे .

ड्रग्ज तस्करी करणाऱ्या या आरोपीचे नाव साबिथ मम्मुहाजी आहे, त्याला त्याच्या ट्रॉली बॅगमध्ये लपवून ठेवलेल्या सहा गांजाच्या पॅकेटसह पकडण्यात आले. जप्त केलेल्या गांजाची अंदाजे



किंमत १.४५ कोटी रुपये आहे.

मुंबई कस्टम्सला मिळालेल्या एका गुप्त माहितीच्या आधारे ही अटक करण्यात आली. जप्तीनंतर, मम्मुहाजीवर नार्कोटिक ड्रग्ज अँड सायकोट्रॉपिक सबस्टन्स ॲक्ट अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आणि त्याला ताब्यात घेण्यात आले.


## टी.सी हरवली

माझी वर्षा किशनराव गवळी या नावाची १० पासची टीसी नांदेड ते जैतापुर बस प्रवासात हरवली आहे. कोणाला सापडल्यास खालील पत्यावर संपर्क साधावा

**–संपर्क पत्ता–**
**वर्षा किशनराव गवळी**
**रा.जैतापुर ता.जि.नांदेड मो.८६५५६९०९९१**

## टी.सी हरवली

माझी श्वेता बालाजी गोरपल्ले या नावाची बारावी विज्ञान शाखेची पासची टीसी लोहा ते नांदेड बस प्रवासात हरवली आहे. कोणाला सापडल्यास खालील पत्यावर संपर्क साधावा.**–संपर्क पत्ता–श्वेता बालाजी गोरपल्ले**
**रा.पवार गल्ली जुना लोहा ता.लोहा जि.नांदेड मो.८६९८३६३७०४**

## कागदपत्र हरवली

माझे सुनिल नारायणराव मांगुळकर या नावाने महाराष्ट्र स्टेट फार्मसी कॉन्सील मुंबई रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट नंबर २२००७ व डायरी पि.पी.कार्ड मुळ कागदपत्रे लातूर फाटा ते सिडको दुचाकीवरून प्रवास करताना हरवले आहे ,कोणास सापडल्यास खालील मोबाईल वर संपर्क साधावा.

**–संपर्क पत्ता–सुनिल नारायणराव मांगुळकर**
**संदीप मेडिकल सिडको नवीन नांदेड मो.९५५२७४७११५**

## टी.सी हरवली

माझी श्री शिवाजी जुनिअर कॉलेज शिवाजीनगर नांदेडची कु. प्रीती सोपान केंद्रे या नावाची बारावी विज्ञान शाखेची टीसी हरवली आहे. सापडल्यास खालील पत्यावर संपर्क साधावा

**–संपर्क पत्ता–**
**प्रीती सोपान केंद्रे**
**यश नगरी,काबरानगर नांदेड मो.९१ ९११२७ ७७७६६**

## Change In Name

I Shaikh Ahemad S/o Maulsaheb R/o. -Valmik Nagar Lokhande Chauk Mukhed Tq.Mukhed Dist.Nanded 431715 have changed My Name SHAIKH AHEMAD MAULASAB TO SHAIKH AHEMAD MAULASAHEB for all purposes. for all future purposes.

## जाहीर पत्रक

माझे पक्षकाराने दिलेल्या माहिती व अधिकारावरुन सर्व जनतेच्या व संबंधितांच्या माहितीस्तव हे जाहीर प्रगटन प्रसिध्द करण्यात येते की, बाबानगर नगर पालीका कर्मचारी सहकारी गृहनिर्माण संस्था म. नांदेड या संस्थेच्या मालकीच्या सर्व्हे नं.४५, ४६ व ४७ पैकी सि.टी. सव्हे नं.६२३६ मधील प्लॉट क्र. ५८/इ चा भाग एकून क्षेत्रफळ ५२० चौ. फुट ज्याच्या चतुः सिमा पुर्वेस रोड, पश्चिमेस : पॉलीटेक्निकची कंपाउंड वॉल, दक्षिणेस सदरील प्लॉटचा भाग व बी. एन. पाखांडे यांची मीळवत, उत्तरेस : कल्याणकर यांचा प्लॉट,

येणेप्रमाणे चतुः सिमेच्या आतील क्र. ५८/इ चा भाग हा संस्थेने संस्थेचे सभासद श्री. श्रीराम पि. पंढरी गोंदगे यांना संस्थेच्या प्रशासकीय मंडळाच्या दि.०५/०७/२०१६ रोजीच्या ठराव क्र. ०३ अन्वये वाटप केलेला असून त्याबाबत संस्थेने त्यांना प्लॉट वाटप प्रमाणपत्र सुध्दा दिलेले आहे.

हे की, आता वरनमुद प्लॉट धारकाने सदरील प्लॉट क्र. ५८/इ चा भाग क्षेत्रफळ ५२० चौ. फुट हा प्रस्तावित खरेदीदार श्री. श्रीधर पि. नवनाथराव भालेराव, रा. मगनपुरा, नांदेड यांना कायमचे हस्तांतरण / विक्री करण्याचा करार केला आहे. त्याबाबत श्री. श्रीराम पि. पंढरी गोंदगे, यांनी संस्थेकडे त्यांचा स्वतः चा सभासदत्वाचा राजीनामा, सौदाचिठ्ठीची प्रत, तसेच नवीन सभासद करून घेण्याबाबतचा प्रस्तावित खरेदीदार यांचा अर्ज इ. कागदपत्र सादर करुन संस्थेच्या संमतीने श्री. श्रीधर पि. नवनाथराव भालेराव, यांच्या नावे रजिस्टर्ड कन्व्हेंन्स डीड करून देण्याबाबत व प्लॉट वाटप प्रमाणपत्र देण्याबाबत संस्थेकडे विहीत नमुण्यात अर्ज केला आहे.

तरी सदरील सि.टी. सर्व्हे नं.६२३५ मधील प्लॉट क्र. ५८/ इ क्षेत्रफळ ५२० चौ. फुट हा वरनमुद प्रमाणे हस्तांतर करण्यास कोणाचा काही आक्षेप अथवा ऊजर असल्यास अथवा सदर प्लॉटवर कोणत्याही बँकेचा अथवा खाजगी संस्थेचा बोजा, गहाणखत अथवा इतर कोणतेही हितसंबंध असल्यास संबंधितांनी हे जाहीर प्रगटन प्रसीध्द झाल्यापसुन ८ दिवसाचे आत आपला आक्षेप अथवा उजर संस्थेच्या कार्यालयात लिखित स्वरुपात नोंदवावा. मुदतीनंतर आलेले आक्षेप हे संस्थेवर बंधनकारक राहणार नाहीत. सबब सर्व जनतेच्या माहितीस्तव हे जाहीर प्रगटन प्रसिध्द केले आहे.

**मार्फत**
**ॲड. अरुण अप्पासाहेब मोरे**
**११६ लक्ष्मीनारायणनगर नांदेड मो. क्र. ७५८८४३०९३२**

## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रॅडन, लॅबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८




# चंद्रभागेत तीन महिलांचा बुडून मृत्यू

**पंढरपुर(प्रतिनिधी)** शनिवारी सकाळी चंद्रभागेच्या नदी पात्रात जालना जिल्ह्यातील तीन महिला बुडाल्या . २ महिलांचा मृतदेह सापडला असून तिसऱ्या महिलेचा अजून तपास सुरु आहे .पंढरपूर येथे श्री विठ्ठलाच्या दर्शनासाठी अनेक भाविक येत असतात . दर्शनासाठी जाण्यापूर्वी भाविक पहिले चंद्रभागा नदीत पवित्र स्नान करतात . आज सकाळी विठ्ठल दर्शनासाठी आलेल्या काही महिला भाविक स्नानासाठी नदीकाठी पोहोचल्या . यातील ३ महिला चंद्रभागा नदीत स्नानासाठी उतरल्या होत्या. त्या पुंडलिक मंदिराजवळ स्नानासाठी गेल्या. पाण्याच्या खोलीचा अंदाज न आल्यामुळे या तिन्ही महिला बुडाल्या. संगीताबाई संजू सपकाळ, वय ४२ आणि सुनीताबाई महादू सपकाळ, वय ३८ अशी त्यांची नावे आहेत. तिसऱ्या महिलेचे नाव अद्याप निश्चित झालेले नाही. नदीपात्रात स्नानास उतरलेल्या आपल्या सोबतच्या महिला भावीक बुडू लागल्यावर इतर महिलांनी आरडा ओरड करून मदतीसाठी पुकारणा केली. मात्र पाण्याचा प्रवाह वेगात असल्याने तिन्ही ही महिला बुडल्या. चंद्रभागेवरील कोळी बांधवांनी बुडालेल्या दोन महिलांचा मृतदेह बाहेर काढला असून तिसऱ्या महिलेच्या मृतदेहाचा शोध अजूनही सुरू आहे.

# 'आर्मी' विंग कमांडरच्या बंगल्यावर दरोडा; ४० तोळे सोन्यासह कॅशही चोरीला

**पुणे (प्रतिनिधी)** पुण्यात मागील काही दिवसांपासून चोरींच्या घटनांमध्ये मोठी वाढ झालीये. पुण्यातील जांभुळकर चौकात लष्कराच्या विंग कमांडर च्या घरावर पहाटे दरोडा पडलाय. यावेळी चोरांनी धमकावत मोठी रक्कम आणि सोन्यावर डल्ला मारला. विंग कमांडर वीरेंद्र कुमार जिंदाल यांच्या घरात घुसून दरोडेखोराने ४० तोळे सोने आणि साडेआठ लाख रुपये रोख रक्कम पळवली. पहाटे अडीच ते तीनच्या सुमारास जांभुळकर चौकात असलेल्या कौशल्या बंगल्यामध्ये ही घटना घडलीये.

विंग कमांडर वीरेंद्र कुमार हे आपल्या कौशल्या बंगल्यात झोपले असताना दोन अज्ञात इसम घरात घुसले. थेट बेडरूममध्ये घुसून विंग कमांडर यांच्या तोंडावर हात ठेवला आणि त्यांना उठवले. दोन्ही चोरट्यानी सोने कुठे अशी विचारणा केली आणि जरा सुद्धा हलू नका असा त्याला दम दिला. त्यांच्या हातामध्ये हातोडी हेक्सा ब्लेड टाईपचे रॉड होते. कमांडरसोबत झटपट करत चोरट्यांनी कपाटाची चावी घेतली आणि कपाटात असलेले तब्बल ४० तोळे सोने आणि साडेआठ लाख रुपये पळवले.

लष्कराच्या विंग कमांडरच्या घरीच दरोडा पडल्याने शहरात खळबळ उडाली आहे. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांकडून तपास हा केला जातोय. बंगल्याला पूर्णपणे सुरक्षा असताना चोर घरात नेमके कसे घुसले, याचा तपास केला जात आहे. चोरटे थेट बेडरूममध्ये शिरले आणि त्यांनी पूर्ण घराची झाडाझडती अगोदर घेतली. वीरेंद्र कुमार हे झोपलेले होते. मात्र, चोरट्यांनी त्यांना अगोदर उठवले आणि त्यांच्या तोंडाला हात ठेवला.


## शंकर नागरी सहकारी बँक लि; नांदेड मुख्य कार्यालय, पोकर्णा बिल्डींग, नवा मोंढा नांदेड

## त्वरीत जागा भरणे आहे

शंकर नागरी सहकारी बँक लि.नांदेड करीता खालील अनुभव असलेले पदे त्वरीत भरणे आहे. तरी बँकिंग क्षेत्राचा अनुभव असणाऱ्या नांदेड जिल्हयातील स्थानिक उमेदवारांनी आपले मुळ अर्ज, शैक्षणिक कागदपत्रे, फोटो व अनुभव प्रमाणपत्राच्या सत्यप्रतीसह शंकर नागरी सहकारी बँक लि; नांदेड मुख्य कार्यालय, पोकर्णा बिल्डींग, नवा मोंढा नांदेड ता.जि.नांदेड या पत्त्यावर दि.२६.०७.२०२५ पर्यंत मिळतील अशा बेताने अर्ज पाठवावेत.

**फक्त बँकिंग अनुभवी उमेदवार करीता**

| अ.क्र. | पद | पदसंख्या | पात्रता |
|---|---|---|---|
| १ | वसुली अधिकरी | २ | १) वसुली अधिकारी पदासाठी पदविधर (B.com/M.com आवश्यक व MBA किंवा GDC & A परीक्षा पास असल्यास प्राधान्य देण्यात येईल.<br>२) नागरी सहकारी बँकेतील वसुली संबंधी काम काजाचा किमान ३ ते ५ वर्षांचा अनुभव असणे आवश्यक<br>३) वसुलीचा अनुभव असणाऱ्या पात्र उमेदवारांनीच सदरील पदासाठी अर्ज करावा. |

**नोट :–** आलेल्या अर्जाची छाननी करुन मुलाखतीचा दिनांक कळविण्यात येईल व मुलाखतीस येण्याचा व जाण्याचा खर्च अर्जदारास स्वतः करावा लागेल.

**बँकिंगचा अनुभव असणाऱ्या उमेदवारांनीच अर्ज करावेत.**

अधिक माहिती साठी बँकेच्या www.shankarbanknanded.com या संकेत स्थळावर भेट दयावी.

**सदरील पदासाठी नांदेड जिल्हयातील स्थानिक उमेदवारांनीच अर्ज करावेत.**

**अध्यक्ष**
**शंकर नागरी सहकारी बँक लि; नांदेड**


## जाहीर पत्रक

**नगर पंचायत हिमायतनगर**

जा.क्र./८५६ **नाव परिवर्तन करणे बाबत**

**वार्ड क्र.१,३,११ अ व १६ मामक्र/१६७,१६८,२९,८२,२३,२३२,२३५,२३६,२३७,२३८,२४०,२९० ते २९, ३१५,३१६**

या जाहिर प्रगटनाच्याअधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की,प्रविण कुमार जन्नावार रा.हिमायतनगर ता.हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, घर/दुकान/ प्लॉट वरील पुर्ण वार्ड नंबर १,३,११ अ व १६ सुर्वणा कुमार जन्नावार च्या नावाने असलेले जायजाद यांनी कोर्ट ड्रिगी/२०२४ दिनांक २८/९/२०२४ च्या विक्री घेतले आहे.किंवा वारसा हक्काने प्राप्त झाली आहे. तरी त्यांचे रजिस्ट्रर रिव्हीजन नगरपंचायत नोंद घेण्यात येत आहे. या संबंधी कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसाच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा.नसता मुदत संपल्यावर अर्जदाराच्या नावे नोंद रजिस्ट्रर मध्ये नोंद घेण्यात येईल. चुर्तसिमा चुर्तसिमा पुर्वे --, पश्चिम: - , दक्षिण :- , उत्तर :-

**मुख्याधिकारी**
**नगरपंचायत हिमायतनगर**

## जाहीर पत्रक

**नगर पंचायत हिमायतनगर**

जा.क्र./८५८ **नाव परिवर्तन करणे बाबत**

**वार्ड क्र.३,५,१६ मामक्र/३०१ ते ३१३,३१७ ते ३३०,३० ,२५४,२८३,२८४,३८५ ते ३८९,३९७ ते ४०१**

या जाहिर प्रगटनाच्याअधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की,प्रशांत कुमार जन्नावार रा.हिमायतनगर ता.हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, घर/दुकान/ प्लॉट वरील पुर्ण वार्ड नंबर १,३,११ अ व १६ सुर्वणा कुमार जन्नावार च्या नावाने असलेले जायजाद यांनी कोर्ट ड्रिगी/२०२४ दिनांक २८/९/२०२४ च्या विक्री घेतले आहे.किंवा वारसा हक्काने प्राप्त झाली आहे.तरी त्यांचे रजिस्ट्रर रिव्हीजन नगरपंचायत नोंद घेण्यात येत आहे. या संबंधी कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसाच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराच्या नावे नोंद रजिस्ट्रर मध्ये नोंद घेण्यात येईल.

चुर्तसिमा चुर्तसिमा पुर्वे --, पश्चिम: - , दक्षिण :- , उत्तर :-

**मुख्याधिकारी**
**नगरपंचायत हिमायतनगर**

## जाहीर पत्रक

**नगर पंचायत हिमायतनगर**

जा.क्र./९०३

**नाव परिवर्तन करणे बाबत**

**वार्ड क्र.१६ मामक्र/३५१,व ३५२**

या जाहिर प्रगटनाच्याअधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की,सौ.पल्लवी संतोष वट्टमवार रा.भोकर, ता.भोकर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, घर/दुकान/ प्लॉट ३५१ व ३५२ वार्ड नंबर १६ सौ.जया प्रविण जन्नावार यांच्या नावाने असलेले जायजाद यांनी कोर्ट डिग्री २०२४ दिनांक २८/९/२०२४ च्या विक्री घेतले आहे.किंवा वारसा हक्काने प्राप्त झाली आहे. तरी त्यांचे रजिस्ट्रर रिव्हीजन नगरपंचायत नोंद घेण्यात येत आहे. या संबंधी कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसाच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा.नसता मुदत संपल्यावर अर्जदाराच्या नावे नोंद रजिस्ट्रर मध्ये नोंद घेण्यात येईल. चुर्तसिमा चुर्तसिमा पुर्वे --, पश्चिम: - , दक्षिण :- , उत्तर :-

**मुख्याधिकारी**
**नगरपंचायत हिमायतनगर**

## जाहीर पत्रक

**नगर पंचायत हिमायतनगर**

जा.क्र./९८०

**नाव परिवर्तन करणे बाबत**

**वार्ड क्र.१८मामक्र/१०५ व १३८,**

याजाहिरप्रगटनाच्याअधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की,संजय सिद्धेश्वर कंचर्लावार रा.किनवट ता.किनवट यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, घर/दुकान/ प्लॉट १०५ व १३८ वार्ड नंबर १८ जयराम सिद्धेश्वर कंचर्लावार च्या नावाने असलेले जायजाद यांनी स्थावर विक्री २०२५ दिनांक १४/७/२०२५ च्या विक्री घेतले आहे.किंवा वारसा हक्काने प्राप्त झाली आहे.तरी त्यांचे रजिस्ट्रर रिव्हीजन नगरपंचायत नोंद घेण्यात येत आहे. या संबंधी कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसाच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा.नसता मुदत संपल्यावर अर्जदाराच्या नावे नोंद रजिस्ट्रर मध्ये नोंद घेण्यात येईल. चुर्तसिमा पुर्वे -प्लॉट नंबर १३७ , पश्चिम: नाला, दक्षिण : रस्ता, उत्तर :सर्व्हे नंबर १८५/१ ,

**मुख्याधिकारी**
**नगरपंचायत हिमायतनगर**

## जाहीर पत्रक

**नगर पंचायत हिमायतनगर**

जा.क्र./९०२

**नाव परिवर्तन करणे बाबत**

**वार्ड क्र.१६ मामक्र/ ३५३/३५४**

या जाहिर प्रगटनाच्याअधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की,प्रज्ञा मंगेश दुधलवार रा.हिमायतनगर ता.हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, घर/दुकान/ प्लॉट ३५३ व ३५४ वार्ड नंबर १६ सौ.जया प्रविय जन्नावार यांच्या नावाने असलेले जायजाद यांनी कोर्ट डिग्री/२०२४ दिनांक २८/९/२०२४ च्या विक्री घेतले आहे.किंवा वारसा हक्काने प्राप्त झाली आहे. तरी त्यांचे रजिस्ट्रर रिव्हीजन नगरपंचायत नोंद घेण्यात येत आहे. या संबंधी कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसाच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा.नसता मुदत संपल्यावर अर्जदाराच्या नावे नोंद रजिस्ट्रर मध्ये नोंद घेण्यात येईल. चुर्तसिमा पुर्वे --, पश्चिम: - , दक्षिण :- , उत्तर :-

**मुख्याधिकारी**
**नगरपंचायत हिमायतनगर**

## जाहीर पत्रक

**नगर पंचायत हिमायतनगर**

जा.क्र./८९२

**नाव परिवर्तन करणे बाबत**

**वार्ड क्र.२० मामक्र/ २३८**

या जाहिर प्रगटनाच्याअधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की,संदिप शंकरराव पळशीकर रा.हिमायतनगर ता.हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, घर/दुकान/ प्लॉट २३८ वार्ड नंबर २० श्रीमती वैशाली भ्र.अभय कोटगिरे यांच्या नावाने असलेले जायजाद यांनी खरेदी पत्रक नंबर बक्षीस पत्र/ २०२५ दिनांक १६/७/२०२५ च्या विक्री घेतले आहे.किंवा वारसा हक्काने प्राप्त झाली आहे.तरी त्यांचे रजिस्ट्रर रिव्हीजन नगरपंचायत नोंद घेण्यात येत आहे. या संबंधी कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसाच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा.नसता मुदत संपल्यावर अर्जदाराच्या नावे नोंद रजिस्ट्रर मध्ये नोंद घेण्यात येईल. चुर्तसिमा पुर्वे -रोड, पश्चिम: पांडूरंग गादेवार, दक्षिण : पांडूरंग गादेवार, उत्तर :संतोष पळशीकर

**मुख्याधिकारी**
**नगरपंचायत हिमायतनगर**

## जाहीर पत्रक

**नगर पंचायत हिमायतनगर**

जा.क्र./८८१

**नाव परिवर्तन करणे बाबत**

**वार्ड क्र.८ अ मामक्र/ ५८/१**

या जाहिर प्रगटनाच्याअधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की,सय्यद खयुम सय्यद नबी रा. हिमायतनगर ता.हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, घर/दुकान/ प्लॉट २८/१ वार्ड नंबर ८ श्री.कै.सय्यद नबी सय्यद याकुब यांच्या नावाने असलेले जायजाद यांनी बक्षीस खरेदी पत्रक शपथपत्र/२०२५ दिनांक ९/७/२०२५ च्या विक्री घेतले आहे.किंवा वारसा हक्काने प्राप्त झाली आहे.तरी त्यांचे रजिस्ट्रर रिव्हीजन नगरपंचायत नोंद घेण्यात येत आहे. या संबंधी कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसाच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा.नसता मुदत संपल्यावर अर्जदाराच्या नावे नोंद रजिस्ट्रर मध्ये नोंद घेण्यात येईल. चुर्तसिमा पुर्वे -सलीम कुरेशी, पश्चिम: रोड, दक्षिण :सय्यद युनुस , उत्तर :अब्दुल हापीज

**मुख्याधिकारी**
**नगरपंचायत हिमायतनगर**

## जाहीर पत्रक

**नगर पंचायत हिमायतनगर**

जा.क्र./८८७

**नाव परिवर्तन करणे बाबत**

**वार्ड क्र.१८ अ मामक्र/ ६६२**

या जाहिर प्रगटनाच्याअधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की,शेख रिजवान शेख हरुन रा.हिमायतनगर दुधड ता.हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, घर/दुकान/ प्लॉट ६६२ वार्ड नंबर १८ अ शेख जहुर शेख मसुद च्या नावाने असलेले जायजाद यांनी खरेदी पत्रक नंबरखरेदीपत्रक ९५२/२०२५ दिनांक ८/७/२०२५ च्या विक्री घेतले आहे.किंवा वारसा हक्काने प्राप्त झाली आहे.तरी त्यांचे रजिस्ट्रर रिव्हीजन नगरपंचायत नोंद घेण्यात येत आहे. या संबंधी कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसाच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा.नसता मुदत संपल्यावर अर्जदाराच्या नावे नोंद रजिस्ट्रर मध्ये नोंद घेण्यात येईल. चुर्तसिमा पुर्वे -कॉलनी रस्ता, पश्चिम: प्लॉट नंबर ४९, दक्षिण : प्लॉट नंबर ५५ , उत्तर :प्लॉट नंबर ५७,

**मुख्याधिकारी**
**नगरपंचायत हिमायतनगर**

## जाहीर पत्रक

**नगर पंचायत हिमायतनगर**

जा.क्र./८८३

**नाव परिवर्तन करणे बाबत**

**वार्ड क्र.५ मामक्र/ ७०/३**

या जाहिर प्रगटनाच्याअधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, गंगाबाई तुकाराम लिंगमपल्ली रा. हिमायतनगर ता.हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, घर/दुकान/ प्लॉट ७०/३ वार्ड नंबर ५ श्री.तुकाराम अंबाजी लिंगमपल्ली यांच्या नावाने असलेले जायजाद यांनी संमती पत्र/२०२५ दिनांक ११/७/२०२५ च्या विक्री घेतले आहे.किंवा वारसा हक्काने प्राप्त झाली आहे.तरी त्यांचे रजिस्ट्रर रिव्हीजन नगरपंचायत नोंद घेण्यात येत आहे. या संबंधी कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसाच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा.नसता मुदत संपल्यावर अर्जदाराच्या नावे नोंद रजिस्ट्रर मध्ये नोंद घेण्यात येईल. चुर्तसिमा पुर्वे -गंगाबाई वानखेडे, पश्चिम: रस्ता , दक्षिण :परमेश्वर वानखेडे , उत्तर :बोळ

**मुख्याधिकारी**
**नगरपंचायत हिमायतनगर**

## जाहीर पत्रक

**नगर पंचायत हिमायतनगर**

जा.क्र./८८२

**नाव परिवर्तन करणे बाबत**

**वार्ड क्र.२१ मामक्र/ ६८९**

या जाहिर प्रगटनाच्याअधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की,अब्दुल रियाज अहेमद अब्दुल मस्जीद रा.हिमायतनगर ता.हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, घर/दुकान/ प्लॉट ६८९ वार्ड नंबर २१ शेख अकिल शेख असरफ च्या नावाने असलेले जायजाद यांनी खरेदी पत्रक नंबर दान पत्र ९५८/२०२५ दिनांक ९/७/२०२५ च्या विक्री घेतले आहे.किंवा वारसा हक्काने प्राप्त झाली आहे.तरी त्यांचे रजिस्ट्रर रिव्हीजन नगरपंचायत नोंद घेण्यात येत आहे. या संबंधी कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसाच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा.नसता मुदत संपल्यावर अर्जदाराच्या नावे नोंद रजिस्ट्रर मध्ये नोंद घेण्यात येईल. चुर्तसिमा पुर्वे -प्लॉट नंरब ५७ , पश्चिम: २० फुट रस्ता, दक्षिण : २० फुट रस्ता , उत्तर :प्लॉट नंबर ५२ ,

**मुख्याधिकारी**
**नगरपंचायत हिमायतनगर**

## जाहीर पत्रक

**नगर पंचायत हिमायतनगर**

जा.क्र./८८४

**नाव परिवर्तन करणे बाबत**

**वार्ड क्र.१५ मामक्र/३६१**

या जाहिर प्रगटनाच्याअधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, शाईदाबी अलीम सय्यद रा.हिमायतनगर ता.हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, घर/दुकान/ प्लॉट ३६१ वार्ड नंबर १५ अफसरी बेगम शेख इमाम यांच्या नावाने असलेले जायजाद यांनी खरेदीपत्र ३०३४/२०२५ दिनांक ३/६/२०२५ च्या विक्री घेतले आहे.किंवा वारसा हक्काने प्राप्त झाली आहे.तरी त्यांचे रजिस्ट्रर रिव्हीजन नगरपंचायत नोंद घेण्यात येत आहे. या संबंधी कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसाच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा.नसता मुदत संपल्यावर अर्जदाराच्या नावे नोंद रजिस्ट्रर मध्ये नोंद घेण्यात येईल. चुर्तसिमा पुर्वे -२० फुट रस्ता, पश्चिम: रिमाका प्लॉट, दक्षिण :मालमत्ता क्र.३६२, उत्तर :मालमत्ता क्र.३६०

**मुख्याधिकारी**
**नगरपंचायत हिमायतनगर**

## जाहीर पत्रक

**नगर पंचायत हिमायतनगर**

जा.क्र./८८५

**नाव परिवर्तन करणे बाबत**

**वार्ड क्र.४ मामक्र/८७/२**

या जाहिर प्रगटनाच्याअधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की,मोनिका ओमप्रकाश जयस्वाल रा.महागाव शिरपूर ता.हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, घर/दुकान/ प्लॉट ८७/२ वार्ड नंबर ४ सुनंदाबाई ज्ञानेश्वर शिंदे च्या नावाने असलेले जायजाद यांनी खरेदी पत्रक नंबर ९५७/२०२५ दिनांक ८/७/२०२५ च्या विक्री घेतले आहे.किंवा वारसा हक्काने प्राप्त झाली आहे.तरी त्यांचे रजिस्ट्रर रिव्हीजन नगरपंचायत नोंद घेण्यात येत आहे. या संबंधी कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसाच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा.नसता मुदत संपल्यावर अर्जदाराच्या नावे नोंद रजिस्ट्रर मध्ये नोंद घेण्यात येईल. चुर्तसिमा पुर्वे -कॉलनी रस्ता, पश्चिम: शिंदे सर, दक्षिण :दशरथ शिंदे , उत्तर :प्रकाश वानखेडे,

**मुख्याधिकारी**
**नगरपंचायत हिमायतनगर**

## जाहीर पत्रक

**नगर पंचायत हिमायतनगर**

जा.क्र./८८९

**नाव परिवर्तन करणे बाबत**

**वार्ड क्र.१० मामक्र/ १९५ व१९८** या जाहिर प्रगटनाच्याअधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की खलील खान गाझी खान पठाण रा. हिमायतनगर ता.हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, घर/दुकान/ प्लॉट १९५ व १९८ वार्ड नंबर १० गाझी खान अहेमद खान यांच्या नावाने असलेले जायजाद यांनी शपथ पत्रक २०२५ दिनांक ४/७/२०२५ च्या विक्री घेतले आहे.किंवा वारसा हक्काने प्राप्त झाली आहे.तरी त्यांचे रजिस्ट्रर रिव्हीजन नगरपंचायत नोंद घेण्यात येत आहे. या संबंधी कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसाच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा.नसता मुदत संपल्यावर अर्जदाराच्या नावे नोंद रजिस्ट्रर मध्ये नोंद घेण्यात येईल. चुर्तसिमा पुर्वे -अजीज भाई८, पश्चिम: अब्दुल अजीज, दक्षिण :रोड , उत्तर :रोड

**मुख्याधिकारी**
**नगरपंचायत हिमायतनगर**

स्थलांतर
सिटी मॅक्स डिजिटल कलर
मो.7058766021,9422185282
गड्डम मार्केट,पहिला मजला,
शिवाजी नगर,नांदेड

गोदातीर समाचार

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस
हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...
किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.
पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308



# विविध विकासकामांच्या संदर्भात खा. अशोक चव्हाण व आ. श्रीजया चव्हाण यांनी घेतली मुख्यमंत्र्यांची भेट



**नांदेड(प्रतिनिधी)–** माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण आणि भोकर विधानसभा मतदारसंघाच्या आ. श्रीजया चव्हाण यांनी शुक्रवारी रात्री मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. यावेळी नांदेड जिल्ह्यातील अनेक विकास कामासंदर्भात चर्चा केली. याप्रसंगी झालेल्या चर्चेत मुख्यमंत्र्यांनी सर्व कामांची सद्यस्थिती जाणून घेतली आणि सदर विषय मार्गी लावण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना निर्देश दिले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मुंबईस्थित 'वर्षा' शासकीय निवासस्थानी झालेल्या भेटीत खा. अशोकराव चव्हाण यांनी नांदेड जिल्ह्यात अवकाळी पाऊस व वादळी वाऱ्यामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना भरपाई देणे, शक्तिपीठ महामार्गासाठी भूसंपादन होत असलेल्या शेतकऱ्यांनी सुचवलेले पर्याय शासनाने जाणून घेणे, नांदेड येथील जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या ५०० खाटांच्या रुग्णालयाला प्रशासकीय मान्यता व निधी उपलब्ध करून देणे, शासनाच्या विविध प्रकल्पांसाठी संपादित होणाऱ्या धरणांच्या लाभक्षेत्रातील जमिनींना बागायतीच्या दराने मावेजा देणे, नांदेड जिल्ह्यातील औद्योगिक वसाहतीसाठी जमीन संपादित करणे, मुंबई-नांदेड व नांदेड-मुंबई थेट विमानसेवेसाठी मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या टर्मिनल एक किंवा टर्मिनल दोनवर स्लॉट उपलब्ध करून देणे, नांदेड येथे विभागीय क्रीडा संकुलासाठी जागा उपलब्ध करून देणे व तिथे इनडोअर स्टेडियमची उभारणी करणे, भोकर येथे आदिवासी मुला-मुलींच्या शासकीय वसति-गृहाची इमारत बांधण्यासाठी जमीन हस्तांतरण करणे, भोकर येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व भगवान बिरसा मुंडा यांचे पुतळे उभारण्यासाठी निधी उपलब्ध करून देणे आदी विषय मांडले.

आ. श्रीजया चव्हाण यांनी प्रामुख्याने खुजडा, ता. मुदखेड येथे केळी टिश्यू कल्चर सेंटर स्थापनेच्या प्रस्तावाला मंजुरी देणे, उर्ध्व पेनगंगा प्रकल्पांतर्गत इसापूर धरणाच्या कालव्यांची वहन क्षमता पुन:स्थापित करणे, नांदेड शहरासाठी पोलीस आयुक्तालयाच्या प्रस्तावाला मंजुरी देणे, नांदेड पोलिसांनी राबवलेल्या 'मिशन निर्भया'ची संपूर्ण महाराष्ट्रात अंमलबजावणी करणे, भोकर विधानसभा मतदारसंघातील जलसंधारणाच्या कामांना व पाणंद रस्त्यांना मंजुरी देणे, जिल्हा परिषद शाळांच्या वर्गखोल्यांचे बांधकाम, दुरुस्ती, डेस्क-बेंचेस, सांडपाण्याच्या योग्य नियोजनासह मुले व मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे, वॉटर कुलर्स व फिल्टर्ससाठी निधीची तरतूद करणे आदी मागण्या मांडल्या. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या विकासकामांच्या मागण्यांना सकारात्मक प्रतिसाद देत संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने निर्देश दिल्याबद्दल खा. अशोकराव चव्हाण आणि आ. श्रीजया चव्हाण यांनी त्यांचे आभार मानले आहेत.

# नांदेडमध्ये भारतातील पहिले किन्नर भवन उभारणार -खा. डॉ. अजित गोपछडे




**नांदेड (प्रतिनिधी) –** समाजातील एक वंचित घटक म्हणून ज्या किन्नरकडे पाहिले जाते त्यांचा सामाजिक दर्जा वाढवा. त्यांना प्रतिष्ठा मिळावी या अनुषंगाने खा. डॉ. गोपछडे यांनी यशस्वी प्रयत्न केले असून, नांदेड शहरालगत साडेतीन एकर जमिनीवर लवकरच किन्नर भवन उभारण्यात येणार आहे. या अनुषंगाने जागेची पाहणी खा. डॉ. अजित गोपछडे यांनी समाज कल्याण अधिकारी आणि संबंधित अधिकाऱ्यांसह केली.

समाजातील तिसरा घटक म्हणून ज्यांच्याकडे पाहिले जाते त्या किन्नर, तृतीय पंथीयांचे सामाजिक जीवन अत्यंत हलाखीचे आणि धक्काधकीचे झाले आहे. त्यामुळे त्यांना सामाजिक प्रतिष्ठा मिळावी, त्यांच्या आयुष्यातही सुख यावे या अनुषंगाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्त्वाखाली राज्य आणि केंद्र सरकारच्या वतीने तृतीय पंथीयांसाठी अनेक नाविन्यपूर्ण योजना राबविल्या जात आहेत. शिवाय त्यांना चांगले जीवन जगता यावे, त्यांच्या जगण्या-मरणाच्या प्रश्नांना न्याय देता यावा यासाठी नांदेडमध्ये कामठा परिसरातील म्हाळजा येथे तब्बल साडेतीन एकर जमिनीवर किन्नर भवन उभारण्यात येणार आहे. येथे किन्नरसाठी स्मशानभूमी, निवास व्यवस्था व अन्य गोष्टींचीही तरतूद करण्यात येणार आहे. या जागेची पाहणी खा. डॉ. अजित गोपछडे यांनी आज केली आहे. याप्रसंगी समाज कल्याण सहाय्यक आयुक्त शिवानंद मिनगिरे, तहसीलदार संजय वारकड, कमल फौंडेशनचे सचिव अमरदीप गोधणे यांच्यासह रणजीता बकस गुरू, फरिदा बकस, अर्चना बकस, जया बकस, बिजली बकस आदी उपस्थित होते.

# उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त जिल्ह्यात जनविश्वास सप्ताह -आ. चिखलीकर यांची माहिती

**नांदेड (प्रतिनिधी) –** महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष अजितदादा पवार यांच्या वाढदिवसानिमित्त येत्या २२ तारखेपासून नांदेड जिल्ह्यात जनविश्वास सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी दिली आहे.

तब्बल सहा वेळा महाराष्ट्र राज्याचा सलग उपमुख्यमंत्री होण्याचा बहुमान मिळवणारे जाणते नेतृत्व तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष अजितदादा पवार यांचा वाढदिवस येत्या २२ जुलै रोजी विविध कार्यक्रमांनी साजरा करण्यात येणार आहे. वाढदिवसानिमित्त सबंध महाराष्ट्रामध्ये जनविश्वास सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने नांदेडसह जिल्ह्यातील तालुका पातळीवरही सामाजिक उपक्रम राबविण्यात येणार आहेत. यात रक्तदान शिबिरे, आरोग्य तपासणी शिबीर, वृक्षारोपण अभियान, युवा संकल्प शिबीर, महिला सक्षमीकरण मेळावा, राष्ट्रवादी विचार मंथन सभा, अजितदादा विकास प्रदर्शन, राष्ट्रवादी संवाद यात्रा आदी कार्यक्रमांचा समावेश आहे. या सर्व कार्यक्रमांचे नियोजन करण्याच्या अनुषंगाने आणि जनविश्वास सप्ताह मोठ्या थाटात यशस्वीरित्या पार पाडण्याच्या अनुषंगाने दिनांक २१ जुलै रोजी दुपारी १ वाजता आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या साई सुभाष या संपर्क कार्यालयात नांदेड येथे महत्त्वपूर्ण बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. या बैठकीला राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्व आजी-माजी आमदार, राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्व प्रदेश कार्यकारिणी सदस्य, जिल्हाध्यक्ष, तालुकाध्यक्ष, शहराध्यक्ष, महिला तालुका अध्यक्ष, महिला शहर अध्यक्ष यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसच्या संलग्न असणाऱ्या सर्व शाखांचे आजी-माजी पदाधिकारी यांनी उपस्थित राहावे, असे आवाहनही शहर जिल्हाध्यक्ष ओमप्रकाश पोकर्णा (माजी आमदार), जिल्हाध्यक्ष बाळासाहेब रावणगावकर, जिल्हाध्यक्ष शिव-राज पाटील होटाळकर, जिल्हा कार्याध्यक्ष माधव पावडे, नांदेड शहर जिल्हा अध्यक्ष माजी आमदार ओमप्रकाश पोकर्णा यांनी केले आहे.

# अवैध व्यवसाय विरोधी अभियान-३; नांदेड परिक्षेत्रात पुन्हा १६७ ठिकाणी 'मासरेड'



**नांदेड (प्रतिनिधी) –** परिक्षेत्रात हातभट्टीची दारू व रसायनाचा नाश, त्याचप्रमाणे अवैध दारूची वाहतूक व विक्री रोखण्यासाठी, दि. १९ जुलै २०२५ रोजी परिक्षेत्रातील चारही जिल्ह्यांत एकाच वेळी मासरेडचे आयोजन करण्यात आले होते.

परिक्षेत्रातील नांदेड, परभणी, लातूर व हिंगोली या चारही जिल्ह्यांत मासरेड दरम्यान, सदर कारवाईत, नांदेडचे पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, परभणीचे पोलीस अधीक्षक रवींद्रसिंह परदेशी, हिंगोलीचे पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे व लातूरचे प्रभारी पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांचे मार्गदर्शनाखाली, संबंधित जिल्ह्यातील अपर पोलीस अधीक्षक, सर्व पोलीस उप अधीक्षक, संबंधित पोलीस ठाण्यांचे पोलीस निरीक्षक/सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक, पोलीस उपनिरीक्षक, अंमलदार यांचेसह स्थानिक गुन्हे शाखेचे अधिकारी व अंमलदार यांचा समावेश होता. सदर कारवाईत परिक्षेत्रातील (१४७) अधिकारी व (६६३) अंमलदार सहभागी झाले होते. चारही जिल्ह्यांनी केलेल्या मासरेड दरम्यान एकूण (१६७) केसेस नोंदविण्यात आल्या आहेत. याप्रकरणी ५,६८,४९५ रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. आपल्या भागातील अवैध व्यवसायांची माहिती नागरिकांनी, संबंधित पोलिसांना देऊन, पोलिसांच्या सदर मोहिमेस हातभार लावावा, असे आवाहन पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी केले आहे.

# नांदेड जिल्हा अर्बन बँक असोसिएशनच्या सचिवपदी विक्रम राजे

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्याच्या आर्थिक क्षेत्रात मोलाचे योगदान देणाऱ्या दि नांदेड जिल्हा अर्बन असोसिएशनची सभा नुकतीच वजिराबाद येथे संपन्न झाली. सदरील सभेत असोसिएशनच्या सचिवपदी शंकर नागरी सहकारी बँकेचे सीईओ विक्रम दुर्गादासराव राजे यांची एकमताने निवड करण्यात आली.

मागील अनेक वर्षांपासून बँकेच्या प्रशासकीय अनुभवाची नोंद घेऊन नांदेड जिल्हा बँक असोसिएशनचे अध्यक्ष प्रा. डॉ. आर. डी. देशमुख व उपाध्यक्ष दिलीप कंदकुर्ते यांनी त्यांच्या निवडीची घोषणा केली.

# शिक्षण अधिकाऱ्याचा बेजबाबदारपणा, विद्यार्थी भौतिक सुविधेपासून वंचित -राम चौधरी यांनी शिक्षणमंत्र्यांकडे केली तक्रार

**नांदेड (प्रतिनिधी) –** माध्यमिक शिक्षणाधिकारी माधव सलगर यांचा बेजबाब-दारपणामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थी भौतिक सुविधेपासून वंचित आहेत. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या सोयी- सुविधा मिळवून देण्यासाठी सरकार सर्वोतोपरी प्रयत्न करत असताना काही अधिकारी मात्र सरकारला व संस्थापकाला सहकार्य करत नाहीत, अशी केली आहे.

तक्रारीत पुढे म्हटले आहे की, मुदखेड येथील सर्वात जुनी शिक्षण संस्था व मोठी शिक्षण संस्था म्हणून गणल्या गेलेली महात्मा गांधी एज्युकेशन सोसायटीतर्फे चालत असलेले महात्मा गांधी माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा आहे.

या शाळेत जवळपास २००० विद्यार्थी शिक्षण घेतात. त्या विद्यार्थ्यांना पुरेपूर भौतिक सुविधा देण्याचे काम संचालक मंडळ करत आहेत, परंतु विद्यार्थी संख्या वाढतच असल्यामुळे संस्थापकांना सुविधा पुरवणे अवघड होत आहे. शासनाचा निधी नसल्यामुळे आमदार-खासदार यांच्या स्थानिक विकास निधीमधून शालेय उपयोगी साहित्य खरेदी केली जाते. त्याप्रमाणे पदवीधर आमदार सतीश चव्हाण यांच्या फंडातून पाच लक्ष ८० हजार रुपयांचे दोन संगणक व ड्युअल डेस्कची प्रशासकीय मान्यता पाच महिन्यापूर्वीच जिल्हा नियोजन अधिकारी कार्यालयाकडून शिक्षण विभागाला मिळाली, पण अद्यापपर्यंत संगणकाची कार्यवाही नाही व ड्युअल डेस्कचीही कार्यवाही नाही.त्यामुळे संस्थेचे अध्यक्ष तथा माजी नगराध्यक्ष राम चौधरी यांनी अनेक वेळा कार्यालयात शिक्षण अधिकारी यांना भेटण्याचा प्रयत्न केला पण शिक्षणाधिकारी महोदय कार्यालयात भेटलेच नाहीत, त्यामुळे फोनद्वारे संपर्क केल्यास म्हणावा तेवढा प्रतिसाद शिक्षणाधिकारी दिलेले नाहीत. संबंधित कारकून सुधीर शिंदे खोटे बोलून शाळेचे मुख्याध्यापक व उपमुख्याध्यापक यांना उडवाउडवीचे उत्तरे देत आहेत, असेही तक्रारीत म्हटले आहे.

शेवटी या तक्रारीत म्हटले की, राम चौधरी यांनी शिक्षण मंत्री दादा भुसे, शिक्षण आयुक्त पुणे, शिक्षण संचालक पुणे, शिक्षण उपसंचालक लातूर, जिल्हाधिकारी नांदेड व पदवीधर आमदार सतीश चव्हाण यांना एक निवेदन देऊन माधव सलगर यांच्या कारभाराची चौकशी करा, अशी मागणी एका निवेदनाद्वारे केली. त्यामुळे आता या प्रकरणात शिक्षण मंत्री व वरिष्ठ कार्यालय शिक्षण अधिकारी माधव सलगर यांच्यावर काय कारवाई करतात याकडे जिल्ह्यातील शिक्षणप्रेमींचे लक्ष लागले आहे.

# लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त सकल मातंग समाजाच्यावतीने अभिवादन



**नांदेड (प्रतिनिधी) –** साहित्यरत्न लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या स्मृती दिनानिमित्त नांदेड येथील अण्णाभाऊ साठे चौक येथे सार्वजनिक जिल्हा जयंती मंडळाच्या वतीने आयोजित या अभिवादन करण्यात आले. यावेळी सकल मातंग समाज, विविध राजकीय पक्षाचे पदाधिकारी यांच्यासह समाज बांधव, पत्रकार, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांनी अभिवादन केले.

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे स्मृती दिनानिमित्त १८ जुलै रोजी डॉ. अण्णाभाऊ साठे चौक नांदेड येथील पुतळ्यास सकल मातंग समाजाचे समन्वयक तथा माजी आमदार अविनाश घाटे, जयंती मंडळाचे स्वागताध्यक्ष ॲड. सुरेंद्र घोडजकर, संयोजक गणेश तादलापूरकर, जिल्हा जयंती मंडळाचे अध्यक्ष नागेश तादलापूरकर, प्रा. देविदास इंगळे, उपाध्यक्ष मारोती चिवळीकर, अंबादास भंडारे, सचिव ईश्वर जाधव, रोहन वाघमारे, निलेश तादलापूरकर, भगवान जाधव, सुनिलकुमार मोघेकर, दिगंबर घायाळे, मारोती कांबळे, चंद्रमुनी कांबळे, कपिल कांबळे, किशन इंगळे, सुनील डोईजड, गुणाजी बुजवणे, सोनू वाघमारे, रामा वाघमारे, आकाश गवाले, प्रकाश बोडारकर यांच्यासह लहुजी साळवे कर्मचारी महासंघ, बिसेफ आदींसह अन्य काही सामाजिक संघटनांचे प्रमुख पदाधिकारी, मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिवा संघटनेच्यावतीने मंत्री संजय शिरसाट यांच्या प्रतिकात्मक पुतळ्याचे दहन



**नांदेड (प्रतिनिधी) –** महात्मा बसवेश्वर आर्थिक विकास महामंडळाबाबत विचारलेल्या प्रश्नांचे उत्तर देताना मंत्री संजय शिरसाट यांनी अतिशय खालच्या भाषेत बसवेश्वर यांचा उल्लेख केला. या घटनेच्या निषेधार्थ शिवा संघटनेच्यावतीने शिरसाट यांच्या पुतळ्याचे दहन करून निषेध करण्यात आला.

शिवा संघटना जिल्हा शाखेच्यावतीने नुकत्याच संपलेल्या विधिमंडळ अधिवेशनामध्ये महात्मा बसवेश्वर आर्थिक विकास महामंडळाबाबत विचारलेल्या प्रश्नांचे उत्तर देताना मंत्री संजय शिरसाट यांनी अतिशय खालच्या भाषेत महात्मा बसवेश्वर यांचा एकेरी उल्लेख बसवेश्वर असा केला. त्यामुळे शिवा संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. मनोहर धोंडे यांनी घोषित केल्याप्रमाणे मंत्री शिरसाट यांनी जर जाहीर माफी मागीतली नाही तर महाराष्ट्रात ठिकठिकाणी जाहीर निषेध केला जाईल व मंत्री शिरसाट यांचे पुतळे जाळले जातील, जोडे मारो आंदोलन केले जाईल, असा इशारा देण्यात आला आहे. त्याचाच एक भाग म्हणून शिवा संघटनेचे राज्य उपाध्यक्ष वैजनाथ तोनसुरे, संपर्कप्रमुख इंजी. अनिल माळगे, जिल्हाप्रमुख विलास कापसे यांच्या नेतृत्वाखाली नांदेडच्या नवीन कौठा येथील महात्मा बसवेश्वर यांच्या पुतळ्यासमोरील चौकात मंत्री संजय शिरसाट यांचा प्रतिकात्मक पुतळा जाळून जाहीर निषेध करण्यात आला आहे.

# दिव्यांगांच्या मानधनात १ हजार रुपयांची वाढ; दिव्यांग संघटनेने फटाके फोडून व्यक्त केला आनंद




**नांदेड (प्रतिनिधी)–** दिव्यांगांच्या मानधनात १ हजार रुपयांची नुकतीच वाढ करण्यात आली आहे. या निर्णयाचा दिव्यांग संघटनेच्या वतीने आनंद व्यक्त करण्यात आला. शासनाच्या या निर्णयाचे दिव्यांग संघटनेने आभार मानले.

सकल दिव्यांग संघटना महाराष्ट्र राज्याच्यावतीने विविध मागण्यांसाठी आंदोलने, मोर्चे काढून जिल्हाधिकारी, खासदार, आमदार, मंत्री यांना वेळोवेळी निवेदन देण्यात आले. पावसाळी अधिवेशनावर मोर्चा काढल्यानंतर राज्य शासनाने मानधनामध्ये एक हजार रुपयांची वाढ केली असून, राज्य शासनाचा सकल दिव्यांग संघटनेच्या वतीने येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा व छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यासमोर फटाके फोडून व पेढे वाटून आनंदोत्सव साजरा करण्यात आला.

संघटनेच्या निवेदनात म्हटले की, दिव्यांगांना चांगल्या प्रकारे जीवन जगता यावे, त्याला जगण्यासाठी आधार मिळावा यासाठी केंद्र व राज्य शासनाच्या वतीने विविध योजनांची अंमलबजावणी केली जाते, परंतु त्यामध्ये स्थानिक आमदार, खासदार व अधिकारी हे निधी योग्यरित्या खर्च करत नसल्यामुळे अनेक दिव्यांगांना जगण्यास बळ मिळत नाही. त्यांना उद्योगासाठी आधार मिळावा, कुटुंब चालवण्यासाठी रोजगार मिळावा यासाठी राज्य शासन व केंद्र शासन आर्थिक मदतीची तरतूद करत असते यासाठी सकल दिव्यांग संघटनेच्या वतीने विविध मागण्यांसाठी मागील बऱ्याच दिवसापासून जिल्हाधिकारी कार्यालय, माजी मुख्यमंत्री, दिव्यांग मंत्री, आमदार, खासदार यांच्या घरावर मोर्चे काढून आंदोलन करण्यात आले. त्याचबरोबर पावसाळी अधिवेशन मुंबई येथे सकल दिव्यांग संघटना महाराष्ट्राच्या वतीने गनिमीकाव्याने मोर्चा काढून आंदोलन करण्यात आले. त्या ठिकाणी समाज कल्याण सहाय्यक आयुक्त शिवानंद मिनगिरे यांनी दिव्यांग मंत्री अतुल सावे यांची भेट घडवून देत तातडीची बैठक आयोजित करण्यात आली. बैठकीत तासभर सविस्तर चर्चा करून सावे यांना निवेदन देण्यात आले. या निवेदनाची दखल राज्य शासनाने घेतली व संजय गांधी निराधार योजनेमध्ये एक हजार रुपयांची त्वरित वाढ करून दिव्यांगांना आधार दिला आहे.

# पिंपळगाव येथे शेतकऱ्याची आत्महत्या

**नांदेड (प्रतिनिधी) –** किनवट तालुक्यातील पिंपळगाव येथील एका शेतकऱ्याने सततच्या नापिकीला व कर्जबाजारीपणाला कंटाळून विष पिऊन आत्महत्या केली. ही घटना १८ जुलै रोजी सायंकाळी साडेचारच्या सुमारास घडली.

किनवट तालुक्यातील पिंपळगाव येथे राहणारा शेतकरी अविनाश तुळशीराम गुरनुले (वय २७) यांच्या शेतात मागील काही वर्षांपासून सततची नापिकी होत होती. तसेच त्यांनी शेतीसाठी कर्ज काढले होते. कर्जाची परतफेड होत नसल्याने अखेर त्यांनी आपल्याच शेतात जाऊन विष प्राशन करून आत्महत्या केली.

या घटनेची माहिती तुळशीराम मारुती गुरनुले यांनी मांडवी पोलिसांना दिल्यानंतर पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे. तपास पोलीस हवालदार मडावी करत आहेत.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com